हिम वर्षावाचे सोबती
जरीवाला येथील
जॅकेट • थर्मल • जर्किन
स्वेटर्स • ग्लोज • सॉक्स
कॅप्स् बरंच काही एकाच ठिकाणी
जरीवाला
• कापड बाजार, नं. 7666510765
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १२.०२.२०२६ | अंक नं. २६१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट
संपर्क : ७७२२ ०७० २२२
www.samatapat.com

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
१ डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant.
कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या
• स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल अँण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)


# कोठला परिसरात मध्यरात्री गोळीबार; युवक जखमी; घटना सीसीटीव्हीत कैद



नगर - शहरातील कोठला परिसरातील राज चेंबरसमोर ११ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे सव्वा अकराच्या सुमारास गोळीबाराची घटना घडली. या गोळीबारात अबरार मुख्तार शेख हा तरुण गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. त्यानंतर त्याच्यावर सध्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गोळीबाराची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अबरार शेख हा राज चेंबरसमोर उभा असताना रिक्षातून आलेल्या एकाने त्याच्यावर अचानक गोळी झाडली. गोळी त्याच्या शरीराच्या खालच्या भागावर लागल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. गोळीबाराच्या घटनेनंतर परिसरात गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने या घटनेबाबत पोलिसांना माहिती दिली आणि जखमी अबरारला तात्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला पुढील उपचारांसाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेमागे मुकुंदनगर परिसरातील जैद सय्यद उर्फ टैप्या भाई याचे नाव समोर येत असल्याची माहिती आहे. वैयक्तिक वादातून हा गोळीबार झाला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमका वाद कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर येऊ शकलेली नाही. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करून पंचनामा करण्यात आला असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

या गोळीबाराच्या घटनेमुळे कोठला आणि मुकुंदनगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले आहे. दरम्यान जखमी अबरार शेख याची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती असून पुढील तपास सुरू आहे.


KYC Verified & Reliable
Professional Drivers
DRIVERSEVA by CONVINIO
@ Your Doorstep in 29 Minutes
BOOK NOW 9422727899
Starting @ ₹999/-
Office Add. : Dhoot Complex, Nagar-Manmad Road, A. Nagar

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्समर्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421


# किराणा दुकानातून चोरी; पाच लाखांची रोकड लंपास

नगर - बोल्हेगाव परिसरातील राघवेंद्र स्वामी मंदिराच्या पाठीमागे असलेल्या अंकिता किराणा स्टोअरवर या दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी गल्लयातील ५ लाख रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी रात्री ११ ते १० फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० या कालावधीत घडली.

या प्रकरणी दुकानदार नंदकिशोर रामविलास दागडिया (वय ४५, रा. राघवेंद्र स्वामी मंदिराच्या पाठीमागे, बोल्हेगाव) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दागडिया हे आपल्या कुटुंबासह दुकानाच्या मागेच वास्तव्यास आहेत. व्यापाऱ्यांचे पैसे देण्यासाठी त्यांनी दुकानाच्या गल्लयात ५ लाख रुपये ठेवले होते. ९ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता दुकान व्यवस्थित बंद करून ते झोपायला गेले होते. मात्र, पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि रोकड पळवून नेली. सकाळी दुकान उघडण्यासाठी आले असता हा प्रकार उघडकीस आला.

दागडिया यांनी त्वरित पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# अहिल्यानगरच्या शाळेच्या सहलीच्या बसला अपघात

## टायर फुटल्याने बस पलटी, विद्यार्थी व शिक्षकांसह १४ जखमी

नगर - जुन्नर तालुक्यातील खामुंडी व डुंबरवाडी गावांच्या हद्दीवर अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर शैक्षणिक सहलीची एसटी बस टायर फुटल्याने मोरीच्या कठड्याला धडकून पलटी झाल्याची घटना १२ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता घडली. या अपघातात १४ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी शहाली (ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) येथील विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी एसटी बसने प्रवास करत होते. खामुंडी-डुंबरवाडी दरम्यान टायर फुटल्याने बस महामार्गाच्या कडेला असलेल्या मोरीच्या कठड्याला धडकली व त्यानंतर पलटी झाली.

अपघाताची माहिती मिळताच डुंबरवाडी व खामुंडी येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थ, तरुण व पोलिसांच्या मदतीने जखमी विद्यार्थ्यांना बाहेर काढून रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. या अपघाताची माहिती डुंबरवाडीचे पोलिस पाटील किरण भोर यांनी ओतूर पोलिसांना दिली.

या अपघातात विद्यार्थी तसेच शिक्षक असे १४ जण जखमी झाल्याचे समजते. जखमी विद्यार्थी व शिक्षक यांच्या उपचारासाठी प्रत्येकी १ हजार रुपयांची तातडीची मदत देण्यात आली आहे.

दरम्यान, अपघातानंतर उर्वरित विद्यार्थी व शिक्षकांना धीर देत खामुंडी ग्रामस्थांनी नाष्ट्यासाठी पोहे, तर डुंबरवाडी ग्रामस्थांनी चहा व बिस्किटांची व्यवस्था केली. स्थानिकांच्या तत्परतेमुळे मदतकार्य वेगाने पार पडले असून पुढील तपास ओतूर पोलीस करत आहेत.

# पाईपलाईन फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

नगर - अहिल्यानगर शहरातील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पराग बिल्डींग येथे महापालिकेची पाईपलाईन ११ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.४५ वाजता फुटली. पाईपलाईन दुरुस्तीचे काम महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे स्टेशन परिसर, आगरकर मळा, विनायकनगर येथील पाणी पुरवठा एक दिवस उशिराने होईल.

तसेच १२ फेब्रुवारी रोजी पाणीपुरवठा होणाऱ्या सारसनगर, बुरुडगावरोड, माणिकनगर, टिळक रोड परिसरास १३ फेब्रुवारी रोजी पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.


Registration No: PM1260002502096
SPLENDOUR Asterra
Premium 2 & 3 BHK Roofments - AT WAGHOLI -
अहिल्यानगरमध्ये अभिमानाने सांगा, पुण्यात आमचं घर 'स्प्लेंडर ॲस्टेरा' मध्ये आहे...
लक्झुरियस आयुष्य, समृध्द भविष्य !
खास अहिल्यानगरवासियांसाठी...
एक दिमाखदार प्रकल्प
कनेक्टेड लोकेशन व प्रीमियम ॲमेनिटीजसह
सकाळ शॉपिंग महोत्सव - 12 to 15 Feb. 2026
तांबटकर मळा, पारिजात चौक, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर.
सकाळ शॉपिंग महोत्सव २०२६
A-27 या स्टॉलला आवर्जून भेट द्या
Premium 2 & 3 BHK Roofments
Wagholi, Pune
- A Project By - PS BUILDCON
- JV Partner - NATRAJ
Site: Splendour Asterra - Opp. Lexicon School, Pune-Nagar highway, Wagholi, Pune
साईट व्हिजीट व माहितीसाठी संपर्क
91122 00974 / 75
www.psbuildcon.com


# कोट्यवधी रुपयांच्या फसवणूक प्रकरणाची 'ईडी' व 'सीबीआय' मार्फत चौकशी करावी

## खासदार निलेश लंके यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मागणी, ३ विषयांवर वेधले लक्ष

नगर - खासदार निलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन नागरिकांशी संबंधित विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी खासदार लंके यांनी तीन स्वतंत्र निवेदने सादर करून तातडीच्या कारवाईची मागणी केली.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करताना खा. निलेश लंके.

पहिल्या निवेदनात समर्थ क्रॉप केअर गो फार्मसी, जी.पी.पी. गुरुकृपा कलेक्शन सेंटर ॲण्ड ट्रान्सपोर्टेशन ॲण्ड फार्म या नावाने कार्यरत असलेल्या एका संस्थेने महाराष्ट्र राज्यात गुंतवणुकदारांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यात आले. जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप संबंधित संस्थेवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यांसारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय मिळवून द्यावा, तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

दुसऱ्या निवेदनात पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी संदर्भातील प्रश्न उपस्थित करण्यात आला. पंतप्रधान कार्यालय 'सेवा तीर्थ' या नव्या इमारतीत स्थलांतरित झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात असल्याने गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले. लोकप्रतिनिधींना त्यांच्या संवैधानिक कर्तव्यांचे पालन करण्यासाठी पीएमएनआरएफ विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

तिसऱ्या निवेदनात पुणे येथील गुन्हे शाखा युनिट-१३ (गुप्तचर विभाग) च्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशानंतरही युनिटचे कामकाज सुरू न झाल्याने आणि १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिल्याने त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट-१३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करण्याचे निर्देश द्यावेत, अशीही मागणी खासदार लंके यांनी केली.

सामान्य नागरिकांच्या हिताशी निगडित प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने, समन्वयाने आणि प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत खासदार निलेश लंके यांनी सकारात्मक प्रतिसादाची आशा व्यक्त केली.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास, रस्त्याचे डांबरीकरण करा अन्यथा १७ फेब्रुवारीला 'उपोषण'

निंबळक – नागापूर चौक ते सावली हॉटेल हा रस्ता निंबळक, इसळक, खारेकर्जूने येथील तसेच पंचक्रोशीतील गावातील नागरिकांचा मुख्य रस्ता असून, गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सुरू असलेल्या कामामुळे अत्यंत खराब अवस्थेत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून मोठा धूरळा उडतो त्यामुळे वाहनचालक, पादचारी, कामगार तसेच व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. दररोज हजारो वाहने या मार्गाने ये–जा करीत असल्याने वाहतूक कोंडी, अपघातांची भीती व नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी काही दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवसेनेचे डॉ. दिलीप पवार यांनी एमआयडीसीचे स्थापत्य उपविभागीय अधिकारी संदीप बडगे यांना १० फेब्रुवारीला निवेदन सादर करून नागापूर चौक ते सावली हॉटेल या रस्त्याचे डांबरीकरण तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली आहे. निवेदनात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना होत असलेला त्रास, वाढता अपघातांचा धोका तसेच जनतेचा वाढता रोष याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

निवेदनानुसार सध्या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असून लाईट पोल बसविणे व अंतिम डांबरीकरण रखडले आहे. त्यामुळे कामात विलंब होत असून नागरिकांच्या संयमाचा आता अंत होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. येत्या ८ दिवसांत काम पूर्ण झाले नाही, तर कार्यालयात १७ फेब्रुवारीला उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या प्रसंगी दिलीप पवार, बी.डी कोतकर, महेश म्हस्के, शिवाजी दिवटे आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# अहिंसा चौक ते आनंदधाम चौक येथे मनपा प्रस्तावित 'पे अॅण्ड पार्क' करु नये


सौ. मीना चोपडा

नगर – अहिंसा चौक ते आनंदधाम चौक येथे फोर–व्हिलर व टू–व्हिलर प्रस्तावित 'पे अॅण्ड पार्क' करण्यास माझा विरोध आहे. कारण आनंदधाम येथे जैन समाजाचे राष्ट्रसंत आचार्य सम्राट गुरूदेव श्री आनंदऋषिजी म.सा. यांची समाधी आहे. देशभरातून रोज लाखो भाविक या ठिकाणी भेट देतात तसेच प्रार्थना, दर्शन, व्याख्यान, उठावणा तसेच इतर धार्मिक कार्यक्रम रोज होत असून सदर प्रसंगी मोठ्या प्रमाणावर आपल्या शहरातील हजारो नागरिक, महिला व ज्येष्ठ नागरिक या निमित्ताने येथे असतात. आपल्या कार्यालयाद्वारे ११ फेब्रुवारी रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहिरात पाहून शहरातील बऱ्याच लोकांनी व धर्मगुरूंनी याबाबत नाराजी व्यक्त केली. येथे 'पे अॅण्ड पार्क' केल्यास रोज वाद होऊन धर्म स्थळास आवश्यक असलेल्या शांततेचा भंग होऊ शकतो.

नागरिकांच्या भावनांचा विचार करून असा अन्यायकारक निर्णय घेऊ नये. अहिंसा चौक ते आनंदधाम चौक व आनंदधाम चौक ते माजी खासदार स्व. दिलीप गांधी यांच्या निवासस्थानापर्यंत फोर–व्हिलर व टू–व्हिलर प्रस्तावित 'पे अॅण्ड पार्क' करू नये, अशी मागणी महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती व नगरसेविका सौ. मीनाताई संजय चोपडा यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# 'पे अॅण्ड पार्क'चा निर्णय रद्द करून वाहनचालकांना हक्काची मोफत व पुरेशी पार्किंग जागा मनपाने उपलब्ध करून द्यावी

## रहदारी नियमानासाठी इतर अनेक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक : महानगरपालिका आयुक्तांकडे मागणी

नगर – प्रत्येक वाहन मालक वाहन खरेदी पासून ते वापरापर्यंत शासनाला विविध प्रकारचे कर अदा करीत असतो. यामध्ये रस्त्यांच्या वापरासाठी रोड टॅक्स देखील भरत असतो. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्याच्या नावाखाली रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात वाहने उभी करण्यासाठी पुन्हा शुल्क आकारणे ही बाब विसंगत व अन्यायकारक असून महापालिका हद्दीतील पे अँड पार्कचा निर्णय रद्द करून वाहनचालकांना हक्काची मोफत व पुरेशी पार्किंग जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, वाहन चालकांकडून केवळ पार्किंग शुल्क आकारल्याने शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार नाही. पार्किंगसाठी राखीव जागेवर बहुमजली पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यास तेथे देखभालीचा खर्च म्हणून नाममात्र पार्किंग शुल्क आकारणे हे काही अंशी योग्य ठरू शकते. परंतु महापालिका हद्दीत रहदारी नियमन व तदअनुषंगिक उपाययोजना करणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये ट्राफिक अॅमेनिटीज – रहदारी सुविधा खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष असते. त्या निधीतून महापालिकेने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व रहदारी नियमानासाठी इतर अनेक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. मात्र महापालिका प्रशासन आपली जबाबदारी टाळून वाहतूक कोंडीच्या नावाखाली वाहन चालकांकडून पार्किंग शुल्क वसूल करण्याचा घाट घालत आहे. ही बाब वाहनचालकांकरिता अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले.

महापालिकेने तयार केलेली पार्किंग पॉलिसी नागरिकांच्या माहितीसाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर तात्काळ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जमा व खर्चात दरमहा ४.६८ कोटी रुपयांची तफावत

## वीज बिलांसह सेवा सुविधा पुरवणारे ठेकेदार, पुरवठादार, कर्मचाऱ्यांची २३० कोटींची देणी थकीत, नागरिकांनी थकीत कराचा भरणा करावा : आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सध्या चिंताजनक आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी २४० कोटींपेक्षा अधिक आहे. गाळेधारकांची थकबाकीही ३० कोटींपेक्षा अधिक आहे. महानगरपालिकेचा कर्मचारी पगार, वीज बिले व इतर अत्यावश्यक सेवांचा दरमहा खर्च २४.४० कोटी आहे. त्या तुलनेत दरमहा सरासरी १९ कोटी रुपये जमा होतात. त्यामुळे जमा आणि खर्चात प्रत्येक महिन्याला ४.६८ कोटींची तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, महानगरपालिकेसमोर एकूण २३० कोटी १५ लाख रुपयांच्या देणींचा डोंगर उभा आहे. त्यामुळे सेवा व सुविधांवर परिणाम होण्याचीही शक्यता आहे. नागरिकांनी त्यांच्याकडे थकीत असलेल्या कराचा भरणा करावा व महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, जीएसटी अनुदान (११.७२ कोटी) आणि महसुली उत्पन्न (८ कोटी) असे मिळून दरमहा सरासरी १९ कोटी ७२ लाख रुपये महानगरपालिकेत जमा होतात. मात्र, कर्मचारी वेतन, निवृत्तीवेतन, पाणी योजना व पथदिव्यांची वीज बिले आणि इतर अत्यावश्यक सेवांचा मासिक खर्च सुमारे २४ कोटी ४० लाख रुपयांवर गेला आहे. यामुळे दर महिन्याला महानगरपालिकेला ४ कोटी ६८ लाख रुपयांचा तुटवडा भासत असून देणीही वाढत आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिकेला २३० कोटींची देणी आहेत. यात कर्मचारी ७ वा वेतन आयोग फरक १०७ कोटी, विकास कामांची देयके ८० कोटी, कुत्र्यांचा बंदोबस्त करणे ५० लाख, विविध योजनांचा मनपा हिस्सा ५० कोटी, पाणी पुरवठा वीज बिल १६.८५ कोटी, इतर देयके ९ कोटी, न्यायालयीन प्रलंबित देयके ९ कोटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (झत्र) रक्कम ७ कोटी, पुरवठादार देयके ४ कोटी, अशुद्ध पाणी आकार ४ कोटी, वेतन कपात रक्कम ३.५० कोटी. ६ वा वेतन आयोग फरक ३.०० कोटी, ५ वा वेतन आयोग फरक २ कोटी, सेवा उपदान रक्कम २ कोटी, परिभाषित निवृत्तीवेतन हिस्सा १.७५ कोटी, अर्जित रजा वेतन रक्कम ७५.०० लाख, कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके ५०.०० लाख, स्ट्रीट लाईट वीज बिल ४८.०० लाख आदींचा समावेश आहे.

महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमाण कमी आणि अत्यावश्यक सेवांचा खर्च जास्त असल्याने आर्थिक नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या कराच्या थकबाकीमुळे दंडाची रक्कमही वाढत आहे. परिणामी महानगरपालिकेसह नागरिकांवरही दंडाचा बोजा पडत आहे. येत्या काळात परिस्थितीत सुधारणा न झाल्यास नागरी सेवा, सुविधांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. मालमत्ता कर आणि इतर करांची थकबाकी मोठ्या प्रमाणात आहे. ही थकबाकी वसूल झाल्याशिवाय विकासकामांना गती देणेही कठीण आहे. त्यामुळे नागरिकांनी आपला थकीत कर त्वरित जमा करून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

# नगरमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; २१ जणांना अटक, पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – शहरातील बागडपट्टी भागातील ढोणे गल्लीत सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकली. या कारवाईत तिरट नावाचा हारजितीचा जुगार खेळणाऱ्या २१ जणांना पोलिसांनी रंगेहात पकडले असून, त्यांच्याकडून मोबाईल आणि रोख रकमेसह एकूण ४ लाख ९३ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस कॉन्स्टेबल विशाल संतोष कुलकर्णी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. सुपा पोलिस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी आणि त्यांच्या सोबत नगर तालुका पोलिस ठाण्यातील पो.हे.कॉ. खंडेराव शिंदे, पारनेर पोलिस ठाण्यातील पो.हे.कॉ. कल्याण लगड, पो.कॉ. सारंग वाघ, गणेश डोंगरे, सुपा पोलिस ठाण्यातील प्रशांत दिवटे, योगेश सातपुते यांचे पथक १२ फेब्रुवारीला पहाटे १.३० च्या सुमारास तोफखाना पोलिस ठाण्यात आले. पो.नि. गडकरी यांनी तोफखान्याचे पो. नि. जगदीश भांबळ यांना सांगितले की बागडपट्टी येथे ढोणे गल्लीत मोठा जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती मिळाली आहे. त्यानंतर पो.नि. गडकरी यांच्या सोबतचे पथक आणि तोफखाना पोलिसांच्या पथकाने पहाटे दोन वाजेच्या सुमारास बागडपट्टी येथे ढोणे गल्लीत एका जुन्या वाड्याच्या भिंतीच्या आडोशाला छापा टाकला. यावेळी दोन गोलाकार घोळक्यांमध्ये बसून आरोपी जुगार खेळत होते.

पोलिसांनी या कारवाईत संजीव रामचंद्र राऊत, अमर रुपा छाडेकर, गणेश प्रल्हाद चोभे, राहुल प्रकाश भट, यशवंत पंढरीनाथ ढोणे, हेमंत गणेश गायकवाड, समाधान श्रीमंत सुरवसे, जिजाबा रखमाजी भोसले, अशोक विश्वनाथ चोभे, विशाल रमेश कानडे, प्रेमशंकर गणेशलाल कश्यप, मोहन दत्तु गोरे, सतीश परशराम जेजुरकर, अशोक बबन घोगरे, तुषार अशोक लड्डा, सूरज अशोक यादव, श्रीमंत निवृत्ती सुरवसे, जिशान खान मंजूरखान पठाण, अमोल महादेव कांबळे, राजू रामदास जगताप आणि रिंटू नंदेलाल महातो यांना ताब्यात घेतले आहे. आरोपींच्या ताब्यातून महागडे मोबाईल संच आणि रोख रक्कम असा एकूण ४ लाख ९३ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# अरणगाव येथील फॅब्रिकेशन व्यावसायिकाची मारहाणीत हत्या

## ११ महिन्यांनी हॉटेल मालकासह ५ जणांवर खुनाचा गुन्हा दाखल

नगर – हॉटेलमधील काचेचे फर्निचर फोडल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून अरणगाव (ता.नगर)येथील एका व्यावसायिकाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या गंभीर मारहाणीत जखमी झालेल्या मिठु कार्तिक दत्त (वय ४२, रा. अरणगाव, ता.नगर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुपा पोलिस ठाण्याच्या पो.नि. ज्योती गडकरी यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेली माहिती अशी की, कोमल फरसान मार्ट आणि हॉटेलचे मालक भाऊसाहेब विश्वनाथ नांगरे व जावेद छोटू आतार (दोघे रा. वाळकी, ता. नगर) यांच्याशी मयत मिठु दत्त यांचा फर्निचरच्या नुकसानीवरून वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून आरोपी भाऊसाहेब नांगरे, जावेद आतार आणि त्यांच्या हॉटेलमधील तीन कामगारांनी मिळून ६ मार्च २०२५ रोजी अरणगाव च्या शिवारातील व्हीआरडीई जवळ असलेल्या 'अजय फॅब्रिकेशन' दुकानात घुसून दत्त यांना लाथाबुक्क्यांनी व शस्त्राने गंभीर मारहाण केली.

या हल्ल्यानंतर जखमी दत्त यांना तातडीने उपचारासाठी पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, १७ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर २३ मार्च रोजी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी केला असून, तपासात मिठू दत्त याचा खुन झाल्याचे निष्पन्न झाले, त्यामुळे त्यांच्या फिर्यादीवरून पाचही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), १८९ (२), १९०, १९१ (२) (३) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास नगर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने करत आहेत.

# पोलीस स्टेशन हद्दीतील जप्त चारचाकी–दुचाकी वाहनांची तात्काळ विल्हेवाट लावा

## वर्षानुवर्षे पडून असलेली बनली डासांची उत्पत्तीस्थाने; परिसर अस्वच्छ, नागरिक त्रस्त; पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन सादर

नगर – शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या आवारात तपासासाठी जप्त करण्यात आलेली किंवा अपघातग्रस्त असलेली शेकडो चारचाकी व दुचाकी वाहने वर्षानुवर्षे पडून असून त्यामुळे ठाण्यांच्या परिसरात अस्वच्छता निर्माण झाली आहे. या वाहनांची विल्हेवाट लावून परिसर स्वच्छ व मोकळा करावा, अशी मागणी प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.


पोलीस स्टेशन हद्दीतील जप्त चारचाकी–दुचाकी वाहनांची तात्काळ विल्हेवाट लावा, या या मागणीचे निवेदन प्रेरणा प्रतिष्ठानच्यावतीने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे देण्यात आले. (छाया – लहू दळवी)

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील जवळपास सर्व पोलीस ठाण्यांच्या आवारात शेकडो निष्प्रयोज्य गाड्या अनेक वर्षांपासून जागा व्यापून पडल्या आहेत. त्यांची कोणतीही लिलाव किंवा स्क्रॅप प्रक्रिया होत नसल्यामुळे त्या गाड्यांमध्ये पाणी साचते, डासांची उत्पत्ती होते आणि दुर्गंधी पसरते. नागरिक आणि पोलीस दोघांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याशिवाय या वाहनांमुळे पोलीस ठाण्यातील पार्किंगची तीव्र समस्या निर्माण झाली असून नागरिकांना ठाण्यात ये–जा करताना त्रास सहन करावा लागतो. या वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

या वेळी निवेदन देताना वैभव ढाकणे, मंगेश खताळ, संतोष ढाकणे, अतुल कावळे, सनी करपे, गौरव कचरे, निलेश कदम, पप्पू पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात दिव्यांगांची हेळसांड, अनेक चकरा मारूनही कामे होत नाहीत

नगर – जिल्हा रुग्णालयात दर बुधवारी दिव्यांगाची तपासणी करून त्यांना उपचार व दिव्यांगप्रमाणपत्र दिले जाते. मात्र येथील रुग्णालयात वारंवार चकरा मारूनही प्रमाणपत्र मिळत नसल्याची तक्रार दिव्यांग बांधवांमधून होत आहे. ११ फेब्रुवारी रोजी डॉक्टरांनी केलेल्या काम बंद आंदोलनानंतर दिव्यांग बांधवांनी त्यांना होत असलेल्या त्रासाचा पाढाच उपस्थितांसमोर मांडला. दिव्यांगांच्या व्यथा ऐकून सर्वचजण हळहळले. जिल्हा शल्यचिकित्सकांनी यात लक्ष घालून दिव्यांना सन्मानाची वागणूक देण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी दिव्यांगबांधवांसह सर्वसामान्यांमधून होत आहे.

जिल्हा परिषदेच्या काही शिक्षकांसह इतर कर्मचाऱ्यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरण उघड झाल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची चांद्यापासून बांद्यापर्यंत चर्चा झालेली आहे. यात काहीजण दोषी आढळलेले आहे. त्यांच्यावर प्रशासनाकडून कारवाई सुरु झालेली आहे. परंतु हे बनावट दिव्यांग प्रमाणपत्र कोणी वितरीत केले. त्याची चौकशी होऊन संबंधितांवरही कारवाई होणे गरजेचे आहे. यासाठी काही संघटनाही पाठपुरावा करीत आहेत. त्यांच्या लढ्याला काही अंशी यश आलेले आहे. यामुळे बनावट दिव्यांग प्रमाणपत्र मिळविणाऱ्या शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. हे प्रकरण आपल्याही अंगलट येईल, याची भीती जिल्हा रुग्णालयातील काहींना वाटू लागलेली आहे. त्यामुळे हे प्रकरण बंद व्हावे, यासाठी आता सर्वच प्रकार वापरणे सुरु झालेले आहे.

बुधवारी डॉक्टरांची केलेलया आंदोलनामुळे दिव्यांग बांधवांचे मोठ्या प्रमाणात हाल झालेले आहे. अचानकपणे येथे आल्यानंतर डॉक्टरांचा काम बंद आंदोलन असल्याचे समजल्यानंतर दिव्यांग बांधवांचे चेहरे हिरमुसले होते. संबंधितांनी आंदोलन करताना अगोदर दहा दिवस किमान अगोदर माहिती देणे गरजेचे आहे. डॉक्टरांच्या आंदोलनामुळे दिव्यांग बांधवांचे आर्थिक नुकसान झालेले असून त्यांना मानसिक त्रास झालेला आहे. या मानसिक त्रासाची भरपाई कोण करणार असा सवाल आता दिव्यांग बांधवांमधून उपस्थित केला जात आहे.

### अचानक आंदोलन करता येते का

सरकारी अधिकारी व कर्मचारी यांना अचानक आंदोलन करता येते का, आंदोलन करताना त्याबाबत किती दिवस अगोदर नोटीस द्यावी लागते, आंदोलनामुळे जर सर्वसामान्यांना त्रास झाला तर संबंधितांवर कारवाई होते का, या आंदोलनाचा निर्णय कधी व केव्हा झाला, यात जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित तोडगा काढून प्रश्न मार्गी का लावला नाही, दिव्यांग बांधवांना झालेल्या गैरसोयीबद्दल प्रशासन कोणावर कारवाई करणार यासारखे प्रश्न आता उपस्थित होत असून त्यावर आता जिल्हा शल्यचिकित्सकांनी खुलासा करावा, अशी मागणी विविध संघटनांमधून होत आहे.

### झेरॉक्सच्या नावाखाली लूट

जिल्हा रुग्णालयाच्या आवारासह प्रवेशद्वारासमोर दर बुधवारी झेरॉक्स व इतर कादपत्र विक्रीची दुकान वाहनांमध्ये थाटली जातात. या झेरॉक्सच्या दुकानांमध्ये एक रुपयाची झेरॉक्स पाच रुपयांना दिली जात आहे. ही दिव्यांगांची गेल्या काही दिवसांपासून लूट सुरु आहे. याकडे मात्र जिल्हा रुग्णालयाचे दुर्लक्ष झालेले आहे.

### अजूनही फिरतात एजंट

दिव्यांग प्रकरण गाजत असतानाही काहीजण कार्यालयाच्या परिसरात फिरून नागरिकांना कागदपत्रे गोळा करून देण्यासाठी मार्गदर्शन नावाखाली आर्थिक लूट करीत असल्याची खंत काही दिव्यांग बांधवांनी व्यक्त केली. दिव्यांग कागदपत्रे घेऊन गेल्यानंतर त्यामध्ये वारंवार त्रुटी काढल्या जातात. मात्र ठरावीक लोक गेल्यानंतर लगेच कागदपत्रे मंजूर केली जातात, असा आरोप अनेक दिव्यांगांनी यावेळी केला.

### शासकीय काम बारा महिने थांब

शासकीय काम बारा महिने थांब या म्हणी प्रमाणे दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांचे काम सुरु आहे. हे काम तातडीने होणे गरजेचे आहे. दिव्यांग प्रमाणपत्रसाठी लागणारी कागदपत्रे व त्यासाठी कोणत्या विभागात किती वेळ लागले, याची माहिती जिल्हा रुग्णालयाने जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

# इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनींशी असभ्य वर्तन; गुन्हा दाखल

श्रीरामपूर – शहरातील एका प्रतिष्ठित प्राथमिक शाळेत एका शिक्षकानेच आठ वर्षीय चार चिमुकलींशी असभ्य वर्तन केल्याची घटना समोर आली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित शिक्षकाला तत्काळ अटक केली आहे.

श्रीरामपूर शहरातील एका नामांकीत प्राथमिक शाळेतील शिक्षक सचिन महाजन गोणारकर (वय ३५, रा. गोणार्क, ता. कंधार, जि. नांदेड, ह. मु. मोरगे वस्ती, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर) या शिक्षकाची १ ऑगस्ट २०२५ रोजी शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे संबंधित शाळेवर नियुक्ती करण्यात आली होती. या शिक्षकाने तो शिकवत असलेल्या वर्गातील इयत्ता दुसरीतील चार विद्यार्थिनींशी केलेल्या असभ्य वर्तनाची वाच्यता संबंधित विद्यार्थिनींनी आपल्या पालकांकडे केली. याचा जाब विचारण्यासाठी पालकांनी शाळा गाठली, त्यानंतर शहर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांची भेट घेऊन सदर प्रकार कानावर घातला.

शहर पोलिसांनी या घटनेची तात्काळ दखल घेत गोणारकर या शिक्षकाविरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आलेली आहे. संबंधित शिक्षक आणि विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

शाळेसारख्या विद्येच्या मंदिरात अशाप्रकारचे कृत्य एका शिक्षकानेच केल्याने समाजामध्ये सदर शिक्षकाबद्दल मोठा असंतोष निर्माण झाला आहे. यामुळे पालकवर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर शिक्षकाला कठोरात कठोर शिक्षा करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

# विश्राम शेळके यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील श्रीरामपूर न.प.चे सेवानिवृत्त अन्न निरीक्षक विश्राम भागाजी शेळके (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, दोन मुले, तीन मुली, सुना, पुतणे, जावई नातवंडे असा परिवार आहे. मुळा – प्रवराचे माजी कर्मचारी सुरेश शेळके, शाम शेळके व मनमाड नगर परिषदच्या माजी उपनगराध्यक्षा सौ. सीमा संजय निकम यांचे वडील, माजी नगरसेवक संजय दिनकर निकम यांचे सासरे – ईश्वर, हौशीराम व प्रल्हाद शेळके यांचे थोरले बंधू होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**शुक्रवार दि. १३/०२/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**श्री हरिहरेश्वर मंदीर,** बागरोजा हडको, दिल्लीगेट, अहिल्यानगर, गौरव गोसळे मो.८९५६९९८११६, प्रसन्न नागपुरे, मो.७०५७०७१७०९

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### कणीस खाण्याचे लाभ

कणीस हे केवळ चविष्ट नाही तर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कॉर्न मध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देतात. कॉर्न खाल्ल्याने बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते . कॉर्नमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ते शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. तसेच कॉर्नमध्ये असलेले जीवनसत्त्वे नवीन पेशी तयार करतात. याशिवाय, ते मधुमेहावरही नियंत्रण ठेवते. या ऋतूत बहुतेक लोकांना सुस्ती जाणवते. अशा परिस्थितीत कॉर्न एनर्जी बूस्टर म्हणून काम करते. त्यात असलेले नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट्स तुम्हाला त्वरित ऊर्जा देतात. जर तुम्हाला वजन लवकर कमी करायचे असेल तर तुम्ही कॉर्न खावे. खरं तर, त्यात असलेले फायबर पोट बराच काळ भरलेले ठेवते. यामुळे तुम्ही जास्त खाणे टाळता. ते कॅलरीज देखील जलद बर्न करते, ज्यामुळे वजन कमी करणे सोपे होते. या काळात अनेक प्रकारच्या हंगामी आजारांचा धोका वाढतो. यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्ही मका खाल्ला तर ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवेलच, पण आजारांचा धोकाही कमी होतो. मक्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

## पाककला

### चॉकलेट बासुंदी

**साहित्य :** दूध-एक लिटर, साखर अर्धा कप, व्हॅनिला इस्सेन्स अर्धा टीस्पून, किसलेले बदाम, काजू, पिस्ते, किसमिस एक चमचा, चॉकलेट सॉस किंवा कोको पावडर तीन चमचे, तूप एक टीस्पून

**कृती :** सर्वात आधी एका मोठ्या कढईत दूध गरम करा आणि मध्यम आचेवर सतत हलवत राहा. आता साखर घालून उकळवा. तसेच दूध अर्ध्या प्रमाणात घट्ट होईपर्यंत उकळवा. व आता चॉकलेट सॉस/कोको पावडर मिसळा, दूध घट्ट झाल्यावर कोको पावडर किंवा चॉकलेट सॉस नीट मिसळा. तसेच फळे व ड्रायफ्रूट्स टाका. किसलेले बदाम, काजू, पिस्ते व किसमिस घालून हलवा. आता व्हॅनिला इस्सेन्स आणि तूप घाला. वरून आणखी थोडे ड्रायफ्रूट्स सजवा. व तयार चॉकलेट बासुंदी थंड करून मुलांना नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### घड्याळाची योग्य दिशा

* घड्याळ नेहमी उत्तर किंवा पूर्वे कडील भिंतीवर लावावे. उत्तर दिशा धनाची देवता कुबेराची आहे.
* दक्षिण दिशा ही यमा ची दिशा मानली जाते. येथे घड्याळ ठेवल्याने प्रगतीत अडथळा येतो आणि आजारपण येते.
* गोल किंवा अंडाकृती घड्याळ सर्वात शुभ असते. तीक्ष्ण कोपरे असलेली घड्याळे टाळा.
* घरात बंद पडलेले किंवा तुटलेले घड्याळ ठेवणे म्हणजे 'डेड टाइम' ला आमंत्रण देणे आहे, ताबडतोब काढून टाका.

## सौंदर्य

एका बादलीत कोमट पाणी घ्या आणि त्यामध्ये सहा कप दूध मिसळा आणि त्या पाण्यात पाय बुडवून ठेवा. असं केल्यानं शरीराचा तापमान कमी होईल आणि त्वचा मऊ होईल.

## सल्ला

सलूनमध्ये अपॉइंटमेंट घेताना, तुमच्याकडे पुरेसा वेळ आहे याची खात्री करा जेणेकरून तुम्हाला घाई होणार नाही. स्पाचा प्रकार निवडताना, तुमच्या केसांच्या गरजा विचारात घ्या. जर तुमचे केस कोरडे असतील तर मॉइश्चरायझिंग स्पा क्रीम निवडावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६

**विजया एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, मूळ १६।१३, सूर्योदय ०६ वा. ४१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. वाहने जपून चालवावीत.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे पदार्थ, हॉटेलिंग वगैरे जपून करा. मागील उधारी वसुल होईल.

**मकर** : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे जपून वापरा.

**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. ईच्छित योजना अंमलात येईल.

# फिल्मीचक्कर क्र. १२२४

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | ■ |
| | ■ | | ■ | ५ | | | |
| ६ | ७ | | ■ | | ■ | | ■ |
| ८ | | ■ | ९ | ■ | १० | ■ | ११ |
| १२ | | १३ | | १४ | | १५ | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| १६ | | | ■ | १७ | १८ | | १९ |
| ■ | ■ | २० | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) सुनील शेट्टी, करिश्मा कपूर यांचा एक चित्रपट ५) ++++ इन्सान (चित्रपटाचे नाव) ६) +++ सा बदन चंचल चितवन (गाणे) ८) मरते ++ तक (चित्रपटाचे नाव) १२) गोविंदा, ऊर्मिला मातोंडकर, यांचा एक चित्रपट सलमानखान १६) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव) १७) संजीवकुमार, वहिदा रहेमान, शर्मिला टागोर, शबाना आझमी, किरण वैराळे यांचा एक चित्रपट २०) ++ देवीयां (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) राज कपूर, झीनत अमान, विनोद मेहरा, आय. एस. जोहर, सुजितकुमार, पिंचू कपूर, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट २) +++ कन्हैय्या ३) शेखर कपूर, डिंपल कापडिया यांचा एक चित्रपट ४) +++ कपूर (अभिनेत्रीचे नाव) ७) सयाजी शिंदे, रविना टंडन, संजय सुरी, रिमा सेन यांचा एक चित्रपट ९) ++ का पंछी (चित्रपटाचे नाव) १०) हीर ++ (चित्रपटाचे नाव) ११) जॅकी श्रॉफ, मीनाक्षी शेषाद्री यांचा एक चित्रपट १३) दिलीपकुमार, वैजयंतीमाला, जॉनी वॉकर, प्राण यांचा एक चित्रपट १४) यात अमिताभची तिहेरी भूमिका आहे १५) छोडो ++ + बातें कल की बात पुरानी (गाणे) १८) अमिताभ बच्चन, मीनाक्षी शेषाद्री यात आहेत १९) ++ उमंग की नयी फसल (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : माणूस म्हणतो की जर पैसा आला तर मी सर्व काही करेन; पैसा म्हणतो की जर तुम्ही काही केले तरच मी येईन.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भारतातील कोणते शहर 'कॉटन सिटी' म्हणून ओळखले जाते?

भारतातील प्रत्येक शहर हे विशिष्ट नावांनी देखील ओळखले जाते. त्यापैकी एक म्हणजे कॉटन सिटी म्हणून ओळखले जाणारे शहर जे अनेकांना माहित नाही. आज आपण याच शहराबद्दल जाणून घेणार आहोत.

तसेच भारतात 'कॉटन सिटी' म्हणून ओळखले जाणारे शहर म्हणजे महाराष्ट्रातील मुंबई शहर होय. प्रसिद्ध असलेल्या मुंबई शहराचा आर्थिक पाया हा कापसावर आधारित आहे याची कल्पना करणे कठीण आहे. ब्रिटिश वसाहत काळात, मुंबई भारतातील सर्वात महत्त्वाचे कापूस व्यापार केंद्र म्हणून उदयास आली. येथील कापसाच्या खरेदी, प्रक्रिया आणि निर्यातीमुळे शहराला एक नवीन ओळख मिळाली. म्हणूनच आज मुंबईला 'भारताचे कापूस शहर' म्हटले जाते. कापूस उद्योगाने केवळ रोजगार निर्माण केला नाही तर शहराच्या आर्थिक वाढीलाही गती दिली.

मुंबईत पहिल्या कापूस गिरण्या ब्रिटिश राजवटीत स्थापन झाल्या होत्या. बॉम्बे स्पिनिंग अँड विव्हिंग कंपनीच्या स्थापनेने देशाचा, विशेषतः मुंबईचा इतिहास बदलला. काही वेळातच डझनभर कापड गिरण्या सुरू झाल्या, ज्यांनी शहराला एक नवीन ओळख देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या गिरण्या कापसाचे उत्पादन सूत आणि कापडात करू लागल्या, ज्या देशांतर्गत आणि परदेशात निर्यात केल्या जात होत्या. मुंबईचे कापड अमेरिका आणि युरोपमध्ये निर्यात केले जाऊ लागले, ज्यामुळे शहर आंतरराष्ट्रीय व्यापार नकाशावर आले.

समुद्रमार्गे कापसाची आयात आणि निर्यात सुलभ झाल्यामुळे मुंबईला कापूस शहर म्हणून उदयास आणण्यात बंदराने महत्त्वाची भूमिका बजावली. मुंबईचे भौगोलिक स्थान, मजबूत व्यापार बाजारपेठ आणि ब्रिटिश धोरणांमुळे कापड उद्योगाला झपाट्याने चालना मिळाली. परिणामी, या उद्योगात काम करणाऱ्या लाखो कामगारांना उत्पन्नाचा चांगला स्त्रोत मिळाला आणि शहराचे झपाट्याने शहरीकरण झाले. मुंबईला केवळ औद्योगिक शहरच नव्हे तर आर्थिक राजधानी बनवण्यात कापूस आणि कापड उद्योगांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या उद्योगांनी बँकिंग, विमा आणि शेअर बाजार यासारख्या उपक्रमांना चालना दिली. कालांतराने गिरण्या बंद पडल्या तरी, त्यांचे योगदान मुंबईच्या ओळखीचा एक भाग राहिले आहे. कॉटन सिटी म्हणून मुंबईचा वारसा हा भारताच्या औद्योगिक इतिहासाचा एक भाग आहे.

### विंचू आणि संत

पावसाळ्याचे दिवस होते. एक विंचू नाल्यात वेगाने तरंगत होता. संताने विंचू नाल्यात तरंगताना पाहिला. त्याने तो बाहेर काढला. त्याच्या स्वभावामुळे विंचूने संताला चावा घेतला आणि चावण्याच्या प्रक्रियेत तो त्याच्या हातातून निसटला आणि पुन्हा नाल्यात पडला. संताने हाताने विंचू बाहेर काढला.

पण विंचूने संताला पुन्हा चावा घेतला. हे आणखी दोन-तीन वेळा घडले. वैद्यराजांचे घर जवळच होते. तो संताकडे पाहत होता.

वैद्यराज धावत आला. त्याने काठीने विंचू फेकून दिला. तो संताला म्हणाला, तुम्हाला माहिती आहे की विंचूचा स्वभाव हानी पोहोचवणे आहे. तरीही तुम्ही त्याला तुमच्या हाताने वाचवले. तुम्ही असे का केले? संत म्हणाले, जर तो त्याचा स्वभाव बदलू शकत नसेल तर मी माझा कसा बदलू शकतो? संतांचे शब्द ऐकून, वैद्याने त्यांना नमस्कार केला.

तात्पर्य : कठीण परिस्थितीतही माणसाने आपला स्वभाव बदलू नये.



## जीवन का अमृत (भाग १)

और नीचे के शरीर और शरीर में जारी साँसों को पूर्ण रूप से भूल जाएं। आप सहमत होंगे कि आमतौर से दिन भर कार्य करते हुए, लिखाई या पढ़ाई, आना-जाना, बैठे हुए, या चलते हुए खाते-पीते या बातें करते हुए, हम कभी भी साँसों की ओर ध्यान नहीं देते। इसी प्रकार, ध्यान-अध्यास के समय, आप इस ओर ध्यान न दें।

(३) क्या सिमरन के अभ्यास के समय आप शरीर में सुन्नपना या अकड़न महसूस करते हैं? अगर हाँ, तो जैसा कि ऊपर समझाया गया है, इसको भी खत्म करना उतना ही जरूरी है। निचले शरीर से सुरत की धारा दिव्य-चक्षु पर आकर सिमट जाती है, अकेले शिष्य की कोशिशों से नहीं, बल्कि सिर पर कार्यरत गुरु-शक्ति के प्रेम और दया से। अंतर में जाने के लिए आप सिमटने की प्रक्रिया की

### आंतरिक दृष्टि

ओर कोई ध्यान न दें, बल्कि आंतरिक दृष्टि को, अंतर में जो कुछ भी दिखे, उसके बीच में टिकाएँ। सिमरन का अभ्यास वास्तव में एक धीमी प्रक्रिया है, पर सतगुरु की दया से जब यह पक्का हो जाता है, तो साधक बिना किसी खास कोशिश के दिव्य चक्षु पर पहुँच जाता है। आप समझ लें कि यह प्रेमपूर्वक भक्ति और आत्मा की दुख भरी पुकार है, जिससे सतगुरु की दया को पाया जा सकता है ।

(४) क्या ध्यानाभ्यास के समय आप अपने विचारों को शांत कर पाते हैं ? स्वाभाविक है, आप कहेंगे, नहीं। मन, बुद्धि को शांत करना, भजन-सिमरन के आखिरी शत्रु पर विजय पाना है। इसे खत्म करने के सर्वोत्तम तरीके को नीचे समझाया गया है : आप इस या उस वस्तु को पाने की कोई भी चाह मन में न रखें। सिर्फ उसके दरवाजे पर बैठें और इंतजार करें। ऐसी परम शांति को पाने का सर्वोत्तम और आसान तरीका है, कृपालु गुरु-शक्ति में प्रेम और नम्रता से यह पूर्ण विश्वास रखना कि जो कुछ भी वह ठीक समझे, दे दे। वह दयालु-शक्ति सदा आपके साथ है और आपकी सच्ची कोशिशों से पूरी तरह वाकिफ है। पर जब तक आप कर्ता हैं, आप खुद अपने रास्ते में बाधा हैं और जब आप प्रेम से अपने आप को मिटा देंगे, तो वह दिव्य ज्योति और पवित्र शब्द धुन के रूप में, आपके सामने प्रकट होगा। यह कुछ ऐसा है, जैसे आप किसी को कमरे में आने का निमंत्रण दे दें और खुद दरवाजे पर खड़े होकर रास्ता रोक लें ख मुझे उम्मीद है कि उपरोक्त की सहायता से आप अपनी त्रुटि ढूँढ पाओगे और सतगुरु की दया से उसे मिटा सकोगे। मैं आपकी चाहत की कद्र करता हूँ, पर सच यह है कि अंतर में बैठा वह महान प्रभुरूप आपको वक्त आने पर अवश्य ही आशीर्वाद देगा, जो भी वक्त वह ठीक समझे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यह चक्र सिर के मध्य में पतालू (नवजात बच्चे का कोमल भाग) में स्थित होता है। बच्चा जब दांत निकालने लगता है तो पतालू का कोमल भाग कठोर हो जाता है। यह ऊर्जा केंद्र पिचुटरी ग्रंथि से जुड़ा है। यह ऊर्जा केन्द्र पीनियल ग्रंथि द्वारा मस्तिष्क और पूरे शरीर पर अपना अधिकार रखता है। इसका सीधा सम्बन्ध आज्ञा चक्र अर्थात मन अर्थात आत्मा से होता है। आकाश तत्व अर्थात सूर्य और भगवान की शक्तियों के प्रवेश करने का मुख्य द्वार है।

सहस्त्रार - १

सहस्त्रार चक्र दोनो कनपटियों से २-२ इंच अन्दर और भौहों से भी लगभग ३-३ इंच अन्दर मस्तिष्क के मध्य में महाविवर नामक एक छिद्र है, उसके ऊपर छोटे से पोले भाग में ज्योति पुंज के रुप में स्थित है। यहीं पर थोड़ा थोड़ा रुक रुक कर एक फुलझड़ी सी जलती रहती है। हृदय की धड़कन गति में भी ऐसे ही मध्यवर्ती विराम रहते हैं। यह १७ तत्वों से बना विलक्षण ज्योति पुंज है जो दृश्य जगत में स्थूल नेत्रों से कहीं भी नहीं देखा जा सकता।

यह प्रकाश टिमटिमाते जुगनु, चमकते तारे,

### चंद्रमा जैसा प्रकाश

मोमबती, आधे या पूर्ण चंद्रमा के प्रकाश जैसा झलकता है। इस में एक महत्वपूर्ण मेधा नाम की शक्ति होती है।

मेधा एक हार्मोन है जो स्मरण शक्ति, एकाग्रता की शक्ति और बुद्धि को प्रभावित करता है। सभी नाड़ियों की ऊर्जा इस केन्द्र में एक हो जाती हैं। जैसे हजारों नदियों का पानी सागर में गिरता है। इस के जागृत होने का अर्थ है चमत्कार और भगवान का साक्षात दर्शन । इस के जागरण से अज्ञान नष्ट हो जाता है जैसे सूर्य के उगने से अंधेरा भाग जाता है। यहां आत्मा परमात्मा से जुड़ जाती है। मनुष्य सभी कर्मों से मुक्त हो जाता है। निर्विकल्प समाधि हो जाती है । मन पूरी तरह शांत हो जाता है। इस स्थान पर अनेक महत्वपूर्ण विद्युतीय और जैवीय विद्युत का संग्रह है।

सहस्त्रार - २

अपने को आत्मा समझ कर सहस्त्रार में ध्यान लगाने से हल्कापन महसूस होता है, क्योंकि आत्मा और सूक्ष्म शरीर का भार नहीं होता इस केन्द्र पर ध्यान लगाने से पृथ्वी के आकर्षण बल का भान होना कम हो जाता है। हम संसार को भूल जाते हैं जैसे सोते समय भूल जाते हैं। जब समाधि से नीचे लौटते हैं तो संसार को देख कर हैरान रह जाते हैं। अपना शरीर रूई की तरह लगता है।

आकाश में चलने या उड़ने की शक्ति आ जाती है। इस में जब ध्यान लग जाता है तो उस समय साधक का शरीर कुछ ऊपर उठ जाता है। सिद्ध योगी परकाया प्रवेश कर सकते हैं। इस में योग लगाने से ऐसी शक्ति प्राप्त हो सकती है कि आप एक समय दो जगह देखे जा सकते हैं। किसी व्यक्ति की आवाज सुनते हैं तो साधक का मन उस आवाज का पीछा करते हुये उस व्यक्ति तक पहुंच जाता है, उस व्यक्ति का चित्र प्रतिक्रिया स्वरूप उस के मन पर अंकित हो जाता है। आंखें बंद होने पर भी बाहर का सब कुछ दिखाई देता है। दीवार, दरवाजा के पार भी देख सकते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंडू पाचव्यांदा सिनेमाचं तिकीट घ्यायला आला तेव्हा विंडोवरच्या माणसाने विचारलं, एकटेच आहात तर इतकी तिकीटं का काढता?
बंडू : मला काय विचारताय? तुमच्या स्टाफला शिकवा ना जरा अक्कल. तो गेटवरचा मूर्ख माणूस दर वेळी फाडून टाकतो तिकीट तर काय करणार?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार कोणास दिला गेला?
– जयसिंग पवार

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

१०) शरीरावरील जखमा व व्रण बरे होण्यासाठी जखमांवर मध लावावा. मध जंतुनाशक असल्याने भाजल्यामुळे किंवा पोळण्यामुळे झालेल्या जखमा लवकर भरून येतात.

११) लहान बालकांची जर झोप कमी असेल, तर अशावेळी अर्धा पेला दुधातून दोन चमचे मध द्यावा. त्याने बालके लगेच झोपतात.

१२) हिरड्यांचे व दातांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी त्रिफळा चूर्ण + मंजिष्ठा चूर्ण + वटसाल चूर्ण यांचे सूक्ष्म चूर्ण एकत्र करून त्यात दोन चमचे मध मिसळावा व या मिश्रणाने दात व हिरड्या घासाव्यात. याने दात पांढरेशुभ्र होऊन चमकतात आणि हिरड्या मजबूत होतात.

१३) वंध्यत्व असणाऱ्या पुरुषांनी कामेच्छा निर्माण होण्यासाठी व शुक्रजंतूंचे प्रमाण वाढविण्यासाठी नियमितपणे रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास थंड पाण्यातून दोन चमचे मध घ्यावा.

### वार्धक्य ठेवते दूर

१४) मध हा तारुण्य वाढविणारे प्रतीक असल्यामुळे तो शुक्रधातूचे प्रमाण वाढवून वार्धक्य दूर ठेवतो व तारुण्य जास्त काळ टिकवितो.

निसर्गाने मनुष्याचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी बहुमोल अशा फळांची निर्मिती केली आहे. फळांच्या स्वरूपात तयार अन्न आपल्या आरोग्यासाठी निर्माण करून निसर्गाने आपल्याला अनमोल अशी देणगीच दिली आहे. भूक लागल्यानंतर न शिजवता न कापताही जसेच्या तसे पटकन आपण फळ खाऊ शकतो. इतर कुठलेही अन्न हे प्रक्रिया केल्याशिवाय खाता येत नाही, फक्त फळे त्याला अपवाद आहेत व हीच खरी फळांची महती आहे.

शरीरास पोषक व नैसर्गिक अन्नतत्त्वांचा मुबलक साठा फळांमध्ये असतो. तसेच शरीरास उपयुक्त खनिजे, जीवनसत्त्वे, क्षार, एन्झाईम्स ही मूलतत्त्वे फळांमध्ये असतात. नियमितपणे फलाहार सेवन करणाऱ्या व्यक्तीचे आरोग्य उत्तम असते. कारण झाडूने जसा आपण कचरा साफ करतो, अगदी तसेच फळे आपल्या शरीरातील अनावश्यक साचलेला कचरा (टॉक्झिन्स) काढून टाकण्यास मदत करतात. फळे नैसर्गिक अन्न असल्यामुळे सहज पचतात, रक्त शुद्ध करतात, पचनमार्ग स्वच्छ ठेवतात व शरीरातील अंतर्गत साचलेली विषेही मलमूत्राद्वारे बाहेर काढतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल संलग्न महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालय, माळीवाडा, अहिल्यानगर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाचे अध्यक्षस्थान शिशु संगोपन संस्थाचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा यांनी भूषविले. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आदी.

# दहावी ही आयुष्याची सुरुवात; आत्मविश्वास ठेवा आणि ध्येय निश्चित करा

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे आवाहन; इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा मार्गदर्शन व प्रोत्साहन समारंभ उत्साहात

नगर – दहावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची पायरी असून ती केवळ परीक्षा नसून भविष्यातील वाटचालीची दिशा ठरवणारा टप्पा आहे. अभ्यासासोबत आत्मविश्वास, सातत्य आणि सकारात्मक विचारसरणी जोपासल्यास यश नक्कीच मिळते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष क्षमता असते, ती ओळखून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन महापौर ज्योती गाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल संलग्न महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालय, माळीवाडा, अहिल्यानगर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाचे अध्यक्षस्थान शिशु संगोपन संस्थाचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा यांनी भूषविले. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, नगरसेवक आकाश कातोरे, प्रमुख वक्ते प्रा. प्रसाद बेडेकर, सौ. प्रिया आनंद बोरा सौ. निशा आशिष पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, विश्वस्त सौ. रश्मी येवलेकर, सचिन डागा, प्रमोद गुगळे, विनोद कटारिया, माजी मुख्याध्यापक लक्ष्मण आव्हाड, माजी प्राचार्य सौ. कांचन गावडे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी, माध्यमिकचे मुख्याध्यपक दत्तात्रय कसबे तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले कि, केवळ गुण मिळवणे हेच यश नसून चांगला माणूस बनणे तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि स्वतःची मेहनत या त्रिसूत्रीवर विद्यार्थ्यांचे भविष्य उभे राहते. शिक्षणातून समाजासाठी योगदान देणारी पिढी घडावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सचिन जगताप म्हणाले कि आजच्या स्पर्धात्मक युगात मेहनत, शिस्त आणि वेळेचे योग्य नियोजन केल्यास कोणतेही ध्येय गाठता येते. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकत पुढे जाणे गरजेचे आहे. शिक्षकांनी दिलेले संस्कार आणि शिक्षण विद्यार्थ्यांना आयुष्यभर मार्गदर्शक ठरते, असे त्यांनी नमूद केले.

प्रा. प्रसाद बेडेकर म्हणाले कि विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे सांगताना मोबाईल आणि सोशल मीडियाचा मर्यादित व योग्य वापर करण्याचा सल्ला दिला. दहावी नंतर करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून योग्य मार्गदर्शन घेऊन निर्णय घेतल्यास उज्ज्वल भवितव्य घडविता येते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात दिलीप गुंदेचा यांनी संस्थेची शैक्षणिक वाटचाल आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर देण्याची भूमिका स्पष्ट केली. संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी संस्थेचा, शिक्षकांचा आणि पालकांचा विश्वास कायम ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

संस्था उपाध्यक्ष दशरथ खोसे यांनी शाळेविषयी माहिती उपस्थितांना दिली

प्रास्ताविक प्राचार्य दत्तात्रय कसबे यांनी केले. सूत्रसंचालन वैष्णवी किंद्रे व श्रद्धा कुलकर्णी यांनी केले. सुभाष पवार यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांचे मनोगत झाली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## शास्त्रार्थ

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

भारतीय समाजरचनेवर प्राचीन काळापासून 'धर्म आणि शास्त्र' यांचा मोठा प्रभाव आहे. माणसाच्या अंतः करणाद्वारा नैतिकतेचा आचार घडविणारा व्यवहार म्हणजे धर्म. मानवाच्या मनात वसत असलेल्या दिव्यत्वाचा आविष्कार म्हणजे धर्म होय तर धर्म सांगण्याची रीत म्हणजे शास्त्र होय. शास्त्राची व्याख्या सांगताना म्हटले आहे,

सर्वस्य लोचनं शास्त्रं ।
यस्य नास्त्यन्ध एव सः ।

शास्त्र हे अनेक संशयांचे निराकरण करून मानवाच्या स्थूल चक्षूंना अगम्य असा अर्थ अभिव्यक्त करते. त्यामुळे शास्त्र हाच माणसाचा खरा डोळा होय.

शास्त्रांचा अर्थ सांगण्यासाठी शास्त्रचर्चा घडते. त्याला शास्त्रार्थ असे म्हणतात. कायदा असेल किंवा शास्त्र असेल, त्याचा अर्थ लावणे आणि सांगणे हे कठीण काम आहे. प्राप्त परिस्थितीनुसार त्याचा अर्थ शोधायचा असतो पण ज्याने शास्त्र अभ्यासले आहे त्यालाच शास्त्राचाही अर्थ सांगण्याचा अधिकार असतो.

दर्शने म्हणजे शास्त्र. मग या शास्त्रांमध्ये जीव, जगत्, ईश्वर, सदाचार आणि मोक्ष यांचा प्रामुख्याने विचार केलेला असतो, त्याचा व्यासंग करताना प्रज्ञावंतांना त्या विषयात काही शंका उपस्थित होतात. काही सिद्धांत किंवा विवेचन त्यांना पटत नाही. अशा वेळी त्या शास्त्राच्या पंडितांमध्ये पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष अशाप्रकारे चर्चा होऊन जे खंडनमंडन होते, त्यालाच 'शास्त्रार्थ' असे म्हणतात.

वादे वादे जायते तत्त्वबोधः ।

अशा वादविवादातून सिद्धांत दृढ होतो आणि तत्त्वबोध अधिक ठसतो. अशा वादाची 'वाद, जल्प आणि वितंडा' अशी तीन रूपे आहेत. खऱ्या तत्त्व जिज्ञासूंमध्ये जो विचारविनिमय होतो, खंडन-मंडन होते, त्याला 'वाद' म्हणतात. परपक्षाचे खंडन करून आत्मसिद्धांताचे मंडन म्हणजे आपलेच म्हणणे खरे करणे याला जल्प म्हणतात तर आपली मते स्थापित करण्यासाठी भला-बुरा युक्तिवाद करून दुसऱ्याला खोडून काढणे या उद्देशाने जो वाद होतो त्याला वितंडा म्हणतात.

विचारमंथनातून जो वाद घडतो त्यालाच शास्त्रार्थ असे म्हटले आहे. वेदकाळापासून आजपर्यंत ही शास्त्रार्थ परंपरा भारतात चालत आली आहे. माझे तेच खरे असे नाही तर खरे ते माझे या भूमिकेतून कोणत्याही तत्त्वाचे साधक बाधक चिंतन करणे हेच पुरोगामी जीवनप्रणालीचेही लक्षण ठरते. भारतीय संस्कृतीने, समाजाने, धर्मसभेने, राजपरिषदेने लोकोत्तर जीवनाचे कोणतेही तत्त्व स्वीकारताना शास्त्रार्थाने मान्य केलेले तत्त्वच स्वीकारले म्हणूनच राजसत्ता असूनही नीतिधर्माप्रमाणे मुक्त जीवन जगता आले.

– किशोर गांधी

# 'हिंद-दी-चादर' उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

नगर – 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, या उपक्रमांचे प्रभावी नियोजन, समन्वय व अंमलबजावणीसाठी अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी विभागनिहाय नोडल अधिकाऱ्यांची आदेशाद्वारे नियुक्ती केली आहे.

यानुसार उपजिल्हाधिकारी श्रीमती भारती सागरे (संपर्क क्र. ७७५६८३५११९), जिल्हा परिषदेचे सहाय्यक गटविकास अधिकारी भगवान बच्छाव (९९२२४४५३३४), सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण गावंडे (७५१७२३५३१५), महानगरपालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे (८३७९८९७१११), जिल्हा रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवशंकर वलांडे (९४२३७१९०४३), अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकुमार नेहरकर (८२७५९४१९००), उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) भिवसेन पवार (९४०४४०२५७२), उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती राजश्री घोडके (९९६०८०६८१६), क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे (७५८८१६९४९३) आणि नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी योगेश मेढे (९०७५२१४७३४) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक ती तयारी वेळेत पूर्ण करून कार्यक्रम यशस्वी करावा व दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचनाही आदेशाद्वारे देण्यात आल्या आहेत.

# बौद्ध विहार मंजुरीसाठी खा. निलेश लंके यांचा पाठपुरावा

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट

नगर – मतदारसंघातील बौद्ध समाजाच्या दीर्घकालीन धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मतदारसंघातील बौद्ध विहार मंजुरीच्या विषयावर सविस्तर, सकारात्मक आणि आशादायी चर्चा झाली.



मतदारसंघातील बौद्ध समाजाच्या दीर्घकालीन धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक मागण्यांबाबत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट घेवून चर्चा करताना खा. निलेश लंके.

मतदारसंघातील बौद्ध समाजाची लोकसंख्या, त्यांची श्रद्धा, धार्मिक परंपरा तसेच सांस्कृतिक जडणघडण लक्षात घेता स्वतंत्र आणि सुसज्ज बौद्ध विहार उभारणी ही अत्यंत आवश्यक व न्याय्य मागणी असल्याचे खासदार निलेश लंके यांनी आठवले यांच्या निदर्शनास आणून दिले. बौद्ध विहार केवळ धार्मिक उपासनेचे केंद्र न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक संवर्धन, प्रबोधन आणि युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा मुद्दाही त्यांनी ठामपणे मांडला.

या विषयावर रामदास आठवले यांनी सहानुभूतीपूर्वक भूमिका घेत प्रस्तावाचा सखोल विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, नियमांची पूर्तता आणि पुढील कार्यवाहीबाबत केंद्र शासनाच्या पातळीवर सहकार्य राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेमुळे बौद्ध समाजाच्या अपेक्षांना नवी दिशा मिळाल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी खासदार निलेश लंके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा उल्लेख करत समाजातील प्रत्येक घटकाला सन्मान, समता आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेच आपले राजकीय व सामाजिक ध्येय असल्याचे सांगितले. बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक गरजांकडे केवळ मागणी म्हणून नव्हे, तर संविधानिक हक्काच्या दृष्टीने पाहिले पाहिजे, असा ठाम विचार त्यांनी मांडला.

मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक विकास या सर्व बाबींमध्ये समतोल साधत काम करण्याचा निर्धार खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केला. बौद्ध विहार मंजुरीसाठी केलेला हा पाठपुरावा हा त्याच व्यापक विकासदृष्टीचा भाग असून, येत्या काळात बौद्ध समाजाच्या उन्नतीसाठी आणखी ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ही भेट आणि त्यातून झालेली सकारात्मक चर्चा बौद्ध समाजासाठी आश्वासक ठरणारी असून, लवकरच प्रत्यक्ष निर्णयाच्या दिशेने पावले पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमात

# 'औषधनिर्मितीवर' प्रत्यक्ष माहिती

नगर– अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्म (D. Pharm) विद्यार्थ्यांसाठी नुकतेच मालाड येथील एटर हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या औषधनिर्मिती कंपनीत शैक्षणिक औद्योगिक भ्रमण आयोजित करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना औषधनिर्मितीतील उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण (QC), गुणवत्ता हमी (QA), पॅकेजिंग तसेच GMP मानकांची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्म विद्यार्थ्यांसाठी नुकतेच मालाड येथील एटर हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या औषधनिर्मिती कंपनीत शैक्षणिक औद्योगिक भ्रमण आयोजित करण्यात आले.

या औद्योगिक भेटीत विद्यार्थ्यांनी उत्पादन युनिट, पॅकेजिंग विभाग आणि गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेचे निरीक्षण केले. कंपनीतील तज्ज्ञांनी औषधनिर्मितीतील सुरक्षितता नियम, स्वच्छता पद्धती आणि नियामक प्रक्रिया यांचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. थिअरीमध्ये शिकलेले ज्ञान प्रत्यक्ष उद्योगात कसे वापरले जाते, याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

औद्योगिक भ्रमणानंतर विद्यार्थ्यांनी कोकण परिसरात साइट-सीन/फील्ड व्हिजिट करून निसर्ग, भौगोलिक रचना व पर्यावरणीय घटकांचा अभ्यास केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये टीमवर्क, निरीक्षण कौशल्य आणि शैक्षणिक सहलीचा सकारात्मक अनुभव निर्माण झाला.

कॉलेज प्रशासनाने नमूद केले की, अशा शैक्षणिक औद्योगिक भ्रमणांमुळे डी. फार्म विद्यार्थ्यांची उद्योगाभिमुख तयारी अधिक भक्कम होते. कार्यक्रमच्या यशस्वी आयोजनाबद्दल एटर हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापनाचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच या संपूर्ण उपक्रमासाठी मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल कॉलेजचे प्राचार्य योगेश बाफना यांचे आभार मानले.

याशिवाय, या औद्योगिक भ्रमणाचे नियोजन व यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी प्रा. माधुरी पवार, प्रा. गायकवाड वृषाली, प्रा. शितल खंडागळे, प्रा. रुचिता पवार व प्रा. धनश्री गटणे यांचे विशेष योगदान लाभले, असे कॉलेज प्रशासनाने सांगितले.

# इंग्लिश ऑलंपियाड स्पर्धेमध्ये सेंट विवेकानंद स्कूलचे यश

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी नेहमीच माध्यमिक विभागाच्या प्राचार्य गीता तांबे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होत असतात.



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी नेहमीच माध्यमिक विभागाच्या प्राचार्य गीता तांबे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होत असतात.

याही वर्षी इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी इंग्लिश ऑलंपियाड स्पर्धेमध्ये उस्फुर्त असा सहभाग नोंदवला होता. यात इयत्ता पहिली ते दहावीच्या ६८ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेसाठी सौ. नम्रता कुकरेजा, सौ. जया मुनगेल आणि इंग्लिश क्लबच्या प्रमुख शिरीन शेख, भावना ढाले, गीता दुमाटे, आशा रंगलानी, समिना शेख, चांदणी सोनाग्रा, करिश्मा शेख, प्रियांका चारगुंडी, राजश्री लांडगे यांनी परिश्रम घेतले.

तसेच संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान तसेच शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले.



पंडित दीनदयाळ पतसंस्थेमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास कव्वाली गायक पवन नाईक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यासाठी पंडित दीनदयाळ पतसंस्था 'स्वतंत्र कक्ष' सुरू करणार

## संस्थापक अध्यक्ष वसंत लोढा यांचे प्रतिपादन

नगर – पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवतावाद हा विचार मांडला. मै अपने लिये नही, अपनों के लिये हु! हा पंडित दीनदयाळ यांच्या विचारांचा वारसा घेऊन गल्या पस्तीस वर्षापासून समाजातील शेवटच्या स्तरावरील माणसांची पत निर्माण करण्याचे कार्य पंडित दीनदयाळ पतसंस्था अविरतपणे करत आहे. अंतोदय योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचली तरच मोठ्या प्रमाणात बदल घडू शकतो. या पंडित दीनदयाळ यांना अपेक्षित असलेल्या योजना गेल्या दहा वर्षापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र व राज्य सरकारने वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत. या सर्व योजनांची सविस्तर माहिती व योजनांचे फॉर्म लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात येईल, असे प्रतिपादन पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ पतसंस्थेमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास कव्वाली गायक पवन नाईक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वसंत लोढा, मानद सचिव विकास पाथरकर, व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया, संचालक बाबासाहेब साठे, अनंत होशिंग, निलेश लोढा, आदित्य चांदेकर, दीनदयाळ परिवाराचे कार्याध्यक्ष सुरज आग्रवाल, सचिव बाळासाहेब भुजबळ, भारतीय जनता पार्टीचे कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, विवेक वाडेकर, नरेंद्र श्रोत्री, राजकुमार जोशी, किशोर गांधी, गोकुळ काळे, ए.एम.कुलकर्णी, साहेबराव विधाते, प्रशांत मुथा, सचिन पारखी, मयूर बोचुघोळ, निलेश चिपाडे, नाथा देवतरसे आदी उपस्थित होते.

गोकुळ काळे यांनी सूत्रसंचालन केले. बाबासाहेब साठे यांनी आभार मानले.

# पशुसंवर्धन विभागाच्या पशु प्रदर्शनास नगरकरांचा मोठा प्रतिसाद

## डॉग शो मध्ये सनी वागस्कर यांचा केन कॉर्सो जातीचा टायसन डॉग ठरला आकर्षण

नगर: अहिल्यानगर येथील केडगाव रोडवरील नेमाणे इस्टेट मैदानावर कृषी पर्व महोत्सवात पशुसंवर्धन विभागाने आयोजित पशु प्रदर्शनास मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पशु प्रदर्शनात नगरमधील जातीवंत श्वानांचा डॉग शो साठी नगरकरांचा मोठा प्रतिसाद पहायला मिळाला नगर शहरातील डॉग ब्रिडर / डॉग प्रेमी सनी वागस्कर यांचा केन कॉर्सो जातीचे डॉग टायसन हा इम्पोर्ट ब्लड लाईन चा डॉग असून तो सध्या १४ महिन्यांचा आहे. केन कार्सो हा डॉग आपल्या मालकाचे व घराचे संरक्षण करण्यात सक्षम आहे एक अत्यंत हुशार ब्रिडचा डॉग मानला जातो या प्रदर्शनात वागस्कर यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



कृषी पर्व महोत्सवात आयोजित डॉग शोमध्ये प्रमुख आकर्षण ठरलेला सनी वागस्कर यांचा केन कॉर्सो जातीचा टायसन डॉग.

जिल्हाभरातील पशुपालक प्रदर्शनास भेट देवून उत्सुकतेने माहित घेत होते. गिनीस बुक मध्ये नोंद झालेली सातारा येथील सर्वात छोटी अडीच फूट उंचीची राधा म्हैस तसेच नेवासा तालुक्यातील अडीच फुट उंचीची सर्वात छोटी गाय, लातूर जिल्ह्यातील देवणी व लाल कंदारी गाय, अकोले तालुक्यातील डांगी गाय सर्वांचे प्रमुख आकर्षण ठरली आहे. पशु पालक आवर्जून या गायी म्हशींची माहिती घेतली आहे. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, सहाय्यक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे, पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल कराळे, डॉ संतोष गायकवाड व डॉ सचिन लोखंडे उपस्थित होते

पशु प्रदर्शनात राज्यातील विविध जातींच्या गोवंश, म्हशी, शेळ्या, विविध पक्षी यांनी प्रदर्शनात भाग घेतला आहे. याबरोबरच जातिवंत देवणी, डांगी, खिलार, लाल कंधारी, पुंगणुर, गिर, साहिवाल, अशा विविध जातींच्या गाई तसेच जाफराबादी व मुर्रा म्हैस तसेच उस्मानाबादी जमुनापारी बीटल बोअर अशा जातींच्या शेळ्या या प्रदर्शनात होत्या. याबरोबरच पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजनांची माहिती येथे देण्यात आली. तसेच विविध चारा पिके त्यांची लागवड व उत्पादन याबाबत या ठिकाणी मार्गदर्शन पशुपालकांना उपयुक्त ठरले आहे. अहिल्यानगर शहर तालुका आणि जिल्ह्यातील पशुपालक व प्राणीप्रेमींनी या प्रदर्शनास भेट दिली.

# अहमदनगर महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा १४ फेब्रुवारी रोजी स्नेहमेळावा

नगर – अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर व अहमदनगर महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते २०२५ पर्यंत शिक्षण घेतलेल्या सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन माजी विद्यार्थी संस्थेचे सचिव डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी केले आहे.

या स्नेहमेळाव्याचे उद्घाटन १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बी. पी. एच. ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. रजनीश बार्नबस यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनानंतर माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन, जुन्या आठवणींना उजाळा देणारा संवाद, स्नेहभोजन तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयीन जीवनातील आठवणी, मैत्रीचे बंध दृढ करण्यासाठी व पिढ्यान्पिढ्यांतील माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा ठरणार आहे. या कार्यक्रमास उपस्थिती नोंदवण्यासाठी https://hosturl.info/1fcfkM या लिंक वर व्हिजिट करून उपस्थिती नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



ज्यांच मन सदा धर्मरत रहातं त्याला देव देखील नमस्कार करतो.

## दिनविशेष १३ फेब्रुवारी

१८३५: मिर्झा गुलाम अहमदफ अहमदिया पंथाचे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: २६ मे १९०८)
१८७९: ङ्गसरोजिनी नायडूफ प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी यांचा जन्म. (मृत्यू: २ मार्च १९४९)
१८९४: वासुदेव सीताराम बेन्द्रेफ इतिहासकार यांचा जन्म. (मृत्यू: १६ जुलै १९८६)
१९१०: ङ्गविल्यम शॉकलीफ नोबेल पुरस्कार प्राप्त, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म.
१९११: ङ्गफैज अहमद फैजफ लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर यांचा जन्म. (मृत्यू: २० नोव्हेंबर १९८४)
१९४५: ङ्गविनोद मेहराफ अभिनेता यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९९०)
१९८५: ङ्गसोमदेव देववर्मनफ भारतीय टेनिस खेळाडू यांचा जन्म.मृत्यू :
१६६२: एलिझाबेथ स्टुअर्टफ बोहेमिया देशाची राणी यांचे निधन. (जन्म: १९ ऑगस्ट १५९६)
१९०१: ङ्गलक्ष्मण बापूजी कोल्हटकरफ गायक नट यांचे निधन. (जन्म: ९ मार्च १८६३)
१९६७: योशूसुका अकावाफ निसान मोटर कंपनीचे संस्थापक यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८८०)
१९६८: गोपाळकृष्ण भोबेफ संगीत समीक्षक, गीतकार व कथालेखक यांचे निधन.
१९७४: अमीर खाँफ इंदौर घराण्याचे संस्थापक व गायक यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९१२)
१९८७: ङ्गएम. भक्तवत्सलमफ भारतीय राजकारणी, मद्रास राज्यचे ४थे मुख्यमंत्री यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८९७)
२००८: ङ्गराजेन्द्र नाथफ हिन्दी व पंजाबी चित्रपटांतील विनोदी अभिनेते यांचे निधन.
२०१२: अखलाक मुहम्मद खानफ ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी यांचे निधन. (जन्म: १६ जून १९३६)
२०२३: ङ्गललिता लाजमीफ भारतीय चित्रकार यांचे निधन. (जन्म: १७ ऑक्टोबर १९३२


गुळाचा गणपती, गुळाचाच नैवेद्य.
अर्थः एखाद्याची वस्तू घेऊन त्यालाच अर्पण करणे.

गोफण पडली तिकडे, गोटा पडला इकडे.
अर्थः कोणत्याही कामात ताळमोळ नसणे.

गवत्या बसला जेवाया आणि ताकासंगे शेवाया.
अर्थः अडाणी मनुष्य चांगल्या वस्तुचा योग्य उपयोग करू शकत नाही.

गोसाव्याशी झगडा आणि राखाडीशी भेट.
अर्थः निर्लज्ज माणसाशी झगडल्यामुळे फायद्यापेक्षा हानीच अधिक होते.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) कलेक्टरचे मराठीत
६) समजावणी
१०) पातळ गोळा
११) सापाचा दुश्मन
१३) एरीया, मोहल्ला
१४) चर्चेकरीता एकत्र येणे
१५) विष्णू पत्नी
१६) शक्तीशाली
१७) स्त्री, ताई
१८) श्रेष्ठ प्रतीचा साधु, गोसाव्यांचा नायक
१९) विनाकारण
२२) गणपतीचा प्रसाद
२३) आपला एक अवयव
२५) अंधारात वावरणारा
२६) चटकन
२८) सीतापती
३०) खोल्यांची रांग
३१) चौल, जावळ राखणे
३२) तर चा सोबती
३३) खाद्य
३४) बसण्याचे एक साधन
३५) चंगळ, विपुलता
३७) एक धूपद्रव्य
३८) तोंड उघडावयाचे असेल तर हे दाबावे लागते
३९) मुले बाळे असलेली
४०) लहान कच्चा खडा
४३) रागाने चरफडणे
४६) शर, बाण
४८) शिवाय, खेरीज
५०) एक फुलझाड
५१) खारट पदार्थ
५२) उजवा विरुद्ध


### उभे संकेत

१) माल, वस्तू २) सहिष्णुता
३) काव काव करणे, रागावणे
४) रीक्त
५)मुलांना भय दाखविण्याकरीता उभा केलेला पूतळा
७) हृदय ८) एक हिरो
९) लहान नौका
११) हावडा–बॉम्बे रेल्वे येथून येथे जाते.
१२) एक व पाव
१७) निघालेला, वेगळा
२०) ग.दि. माडगूळकर यांचे एक प्रसिद्ध काव्य
२१) चकाकी
२२) तांबे व गंधक यांचे मिश्रण
२३) यात मेकुड असते
२४) देवावरील विश्वास
२७) चिलखत २९) अतिशय रोड
३३) लहान खाट ३४) महात्मा गांधी
३६) मुंबई–पुणे मार्गावरील पहाडी रस्ता ३७) सुपीक जमीन
३८) बांगड्या ४१) बारा पैसे (हिं.)
४२) नजर ठेऊन ४४) अग्नि
४५) पंख ४७) राखणे ४९) कोरा

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | ल | तो | पा | ग | ल | है | | लं | का | प | ती | |
| व | ट | | व | र | | वा | | | वे | त | न | |
| स | | स | न | | रा | न | गो | व | री | | शे | क |
| | आ | रा | | म | जा | | ड | | | दु | पा | र |
| धा | न्य | फ | रा | ळ | | रा | जे | शा | ही | | स | ण |
| न्य | | | ज | | रा | ज | व | ट | | अ | ष्ट | क |
| पं | ढ | र | पू | र | | का | न | | प | | | र |
| च | | | त | म | च | र | | मा | रा | मा | री | |
| क | सा | ई | | ता | र | ण | ध | न | | व | | का |
| | व | र | | रा | स | | न | | पा | स | | शी |
| आ | र | सा | | म | | ह | वा | पा | णी | | पा | |
| न | क | ल | | | ज | वा | न | | दा | र | व | ण |
| न | र | | च | तु | रा | ई | | का | र | ण | | व |

## STUDENT CAREER FOR MPSC EXAM




१) बोरॉन आणि कॅल्शियमची कमतरता पिकांच्या पानाच्या कोणत्या भागावर दिसते? अ)सर्वात वरची पाने ब)मधली पाने क)पानांच्या आतील शिरा ड)खालची पाने
२) सारे जहां से अच्छा हिंदोस्तां हमारा या लोकप्रिय राष्ट्रगिताचे रचीयता खालीलपैकी कोण?अ)मजरुह सुल्तानपूरी ब)महम्मद इकबाल क)सादिक अली ड)सलीमुझा
३) भारतामध्ये सर्वाधिक लागवडीखालील क्षेत्र खालीलपैकी कोणत्या पिकाखाली येते? अ)बाजरी ब)कापूस क) भात ड)भूईमूग
४) पहिल्या राष्ट्रीय नियोजन समितीचे अध्यक्ष कोण होते? अ)डॉ. आंबेडकर ब)लाला लजपतरॉय क)महात्मा गांधी ड)पंडित नेहरु
५) मुलद्रव्याची आधुनिक आवर्तनसारणीचा पुढीलपैकी कोणता पायाभूत गणविशेष आहे? अ)अणुक्रमांक ब)रेणुभार क)इलेक्ट्रॉन सरुपण ड)अणुभारांक
६) वैमानिक जमिनीवरील दृश्य कोणत्या पडद्यावर पाहू शकतो? अ)ॲमराम ब)फड क)लंटीर्न ड)रडार
७) ठिबक सिंचन पद्धतीमुळे चिकन मातीचा ओला भाग कसा असतो? अ)खोल ब)उथळ क)रुंद ड) अरुंद
८) मुलभूत हक्काचा ठराव १९३१ साली काँग्रेसच्या कुठल्या अधिवेशनात संमत करण्यात आला? अ)कराची ब)सुरत क)दिल्ली ड)लुधियाना
९) अमूल बटर उत्पादन करणारी संस्था खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे? अ)खाजगी ब)सहकारी क)सरकारी ड)निमसरकारी
१०) १९१५ साली मद्रास प्रांतातील अड्यार येथे होमरुल लिगची स्थापना खालीलपैकी कोणी केली? अ)म. गांधी ब)ॲनी बेझंट क)बाबा आमटे ड) लो. टिळक
११) १ मे १९९९ रोजी महाराष्ट्रात आणखी दोन जिल्ह्यांची निर्मिती झाली ते खालीलपैकी कोणते? अ)हिंगोली व सिंधदुर्ग ब)भंडारा व हिंगोली क)हिंगोली व गोंदिया ड) नंदुरबार व हिंगोली
१२) भारतीय राज्य घटनेच्या १४ व्या कलमातील कायद्यासमोरील समानता हा शब्द प्रयोग कोणत्या देशाच्या राज्यघटनेपासून घेतला आहे? अ)फ्रान्स ब)ग्रेट ब्रिटन क)जपान ड)न्यूझीलंड
१३)सापेक्षता सिद्धाताचा जनक म्हणून कोणास ओळखले जाते? अ)ऑईन्स्टाईन ब)एडिसन क)न्यूटन ड)डॉ. भाभा
१४) राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाची स्थापना कधी झाली? अ)११ मे २००० ब)२२ जून २००१ क)१ जानेवारी २००० ड) १ एप्रिल २००२
१५) जुल्मी व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनची तुलना मुगलबादशाह औरंगजेबशी कोणी केली? अ)लाला लजपतराय ब)आगरकर क)लो. टिळक ड)आंबेडकर
१६) भारतातील विद्यार्थी संघटनांच्या तसेच विद्यालय व महाविद्यालय निवडणुका प्रणाली व पद्धती विषयी शिफारस करण्यासाठी कोणती समिती नेमली गेली? अ)लिब्राहम आयोग ब)जे.एम. लिंगडोह क)विरप्पा मोईली आयोग ड) नानावटी आयोग
१७) १८७१ साली पुणे येथे स्त्री विचारंवती ही सामाजिक संस्था कोणी स्थापन केली? अ)पंडिता रमाबाई ब)अहिल्याबाई होळकर क)सावित्रीबाई फुले ड)सरस्वती गणेश जोशी
१८) कृषी कर विषयक खालीलपैकी कोणती समिती नेमण्यात आली होती? अ)वांछू समिती ब)राजा चेलय्या समिती क)एल. के. झा समिती ड)राज समिती
१९) १८५६ साली भारतात विधवा पुर्णविवाह कायदा कोणी संमत केला? अ)लॉर्ड कॅनिंग ब)लॉर्ड स्टेनले क)लॉर्ड अॅचीसन ड)लॉर्ड डलहौसी
२०) देशात पंचायतराजची सुरुवात खालीलपैकीकोणत्या राज्यात करण्यात आली? अ)मध्यप्रदेश ब)बिहार क)राजस्थान ड)आसाम
२१) सर्वात चांगला विजेचा सुवाह खालीलपैकी कोणता धातू आहे? अ)लोखंड ब)चांदी क)तांबे ड)ॲल्युमिनियम
२२) पक्षांचा अभ्यास खालीलपैकी कोणत्या शाखेत केला जातो? अ)ॲन्टॉलॉजी ब)बायोलॉजी क)ॲस्टीओलॉजी ड)ऑर्नीथॉलॉजी
२३) इन्ट्राक्युलर प्रेशर वाढल्यामुळे काय होते? अ)दृष्टीकमी होणे ब)पिलीया क)ग्ल्युकोमा ड)टीबी
२४) इ.स. १९२० साली माणगाव (कोकण) येथे शाहू महाराजांनी येथे कोणत्या परिषदेचे अध्यक्षपद भुषविले होते? अ)अस्पृश्य परिषद ब)समता परिषद क)शेतमजूर परिषद ड) आर्यप्रतिनिधी सभा

उत्तरः (१- क), (२-ब ), (३-क), (४-ड), (५-अ), (६-क), (७-ड), (८-अ), (९-ब ), (१०-ब), (११-क), (१२-ब),(१३-अ),(१४-अ),(१५-क), (१६-क), (१७-ड), (१८-ड),(१९-अ), (२०-क), (२१-ब ),(२२-ड),(२३-क), (२४-अ).

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन् १९९६ में आए फिल्म शस्त्र के निर्देशक. ३) सन् १९८४ में नासिर हुसैन की इस फिल्म में सनी देओल, डिम्पल कपाडिया थे. ६) सन् १९९१ में यश चोपडा की इस फिल्म में अनिल कपूर और श्रीदेवी थे. ७) सन् १९७९ में दीपक बाहरी के इस फिल्म में मिथून चक्रवर्ती, रंजीता थे. ९) सन् १९९१ में रमेश सिप्पी के इस फिल्म में अमिताभ बच्चन और अमृता सिंह थे. १२) सन् १९९९ में बनी इस फिल्म में अक्षय कुमार, माधुरी दीक्षीत, सैफ अली खान थे.
१३) गोविंदा, नम्रता शिरोडकर, ऐश्वर्या रॉय अभिनीत एक फिल्म.
१४) सन् १९९९ में करण जौहर की इस फिल्म में शाहरुख खान, काजोल और रानी मुखर्जी थे.
१६) xxx का अर्जून (फिल्म)
१७) xxx बडजात्या (निर्देशक)
१९) xx x होना ही था (फिल्म)
२१) सन् २००१ में मुकेश भट्ट के इस फिल्म में आफताब शिवदासानी और लिसा रे थे. २२) सन् १९९६ में डेविड धवन के इस फिल्म में ऋषी कपूर, जुही चावला, विनोद खन्ना थे. २३) सन् १९९० में राकेश सेठी के इस फिल्म में जैकी श्रॉफ, सोनम थे. २५) सन् १९७१ में एम. तिरुमुगम के निर्देशन में बनी इस फिल्म में राजेश खन्ना, तनूजा थे. २८) वो xx दिन (फिल्म) २९) सन् १९९३ में राहूल रवैल की इस फिल्म में सनी देओल, अमृता सिह थे. ३०)xx कुमारी (नायीका)

### उभे संकेत

१) सन् १९९२ में के. विश्वनाथ के इस फिल्म में जैकी श्रॉफ, माधूरी दीक्षीत थे. २) xx नायक (फिल्म) ३) सन् १९८३ में श्याम बेनेगल की इस फिल्म में शबाना आझमी, नसीरुद्दीन शाह थे.
४) सन् २००१ में इ. निवास के इस फिल्म में फरदीन खान और सोनाली बेंद्रे, आफताब शिवदासानी, जॉनी लिव्हर थे.
५) सन् १९७२ में रामानंद सागर की इस फिल्म में राजेंद्रकुमार, माला सिन्हा थे. ८) सन् १९८८ में सुनील हिंगोरानी की इस फिल्म में अनिल कपूर, श्रीदेवी थे.
१०) सन् १९८६ में एच.एस. रवैल की इस फिल्म में अनिल कपूर और रंजिता थे. ११) सन् १९९६ में पंकज पाराशर के इस फिल्म में अनिल कपूर और माधूरी दीक्षीत थे. १५) सन् १९९९ में पी. वासू के निर्देशन में बनी इस फिल्म में अजय देवगन, नेहा, अरशद वारसी थे. १७) सन् १९८९ में बनी इस फिल्म में राजकुमार, विनोद खन्ना, अमरीश पुरी थे. १८) सावन को आने दो इस फिल्म में अरुण गोवील की नायीका. २०) xx नंबर वन (फिल्म) २४) सन् १९८० में राज खोसला की इस फिल्म में अमिताभ बच्चन, जीनत अमान थे. २६) xx नाम जोकर (फिल्म) २७) हम xxx (फिल्म)
२८) मोहसीन खान, वर्षा उसगावकर, आदित्य पांचोली की फिल्म.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मु | झ | से | दो | स्ती | क | रो | गे | | रा | म | पा | ल |
| झे | | | स्ता | | री | | | | | जा | | क्ष्मी |
| | स | प | ना | | ना | | | म | शा | ल | | लां |
| | ल | | | ए | क | ही | रा | स्ता | | | अं | त |
| अ | मा | न | | | पु | | | ना | म | | | प्या |
| | न | | मि | स्ट | र | | रा | | | सा | थी | रे |
| | खा | | | | | | ह | म | रा | ज | | ला |
| जॉ | न | अ | ब्रा | ह | म | | | हा | | न | व | ल |
| नी | | क्ष | | | नो | | | दे | | | | |
| लि | | य | | | ज | री | ना | व | हा | ब | | जा |
| व्ह | | ख | ट्टी | | कु | | य | | | ल | गा | न |
| र | | न्ना | | | मा | | क | | | वा | | व |
| | | पिं | ज | र | | | | प्रे | म | न | ग | र |

## पाक कला

### चटणीचा पराठा

साहित्यः कणीक–दोन वाट्या, मीठ चवीनुसार कोथिंबीर, मिरची, लसूण, नारळ, मीठ घालून वाटलेली दाट, हिरवी चटणी, तूप.

कृतीः कणकेत मीठ घाला व कणीक मऊसर मळून घ्या. त्याचे मध्यम उंडे करा. प्रथम एक उंडा थोडा जाडसर, लहान गोलाकार लाटा. गरम तव्यावर टाका. थोडे तूप सोडून दोन्ही बाजूंनी लालसर करा. काढा. दुसरा उंडा, तोपर्यंत तसाच लाटा. पहिली पोळी काढा व हा उंडा एका बाजूने चांगला भाजा. दुसरा अर्धवट भाजा. आधीच्या पोळीवर, एका बाजूस चटणी पसरवा. त्यावर दुसरी पोळी, जिची लाल बाजू यावर पालथी घाला. अलगद दाबा. हा डबल पराठा, तव्यावर घाला व दोन्हीं बाजूंनी तूप घालून लाल भाजा.

# ‘देशव्यापी संपा’च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा; घोषणाबाजी व निदर्शने; सरकारी, निमसरकारी कर्मचारी-शिक्षकांचा सहभाग

### मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा

नगर – देशातील ११ प्रधान संघटना व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार १२ फेब्रुवारी रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरात सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत निदर्शने करण्यात आली. कामगारविरोधी धोरणांचा निषेध करीत व प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. मागण्यांची दखल न घेतल्यास पुढील काळात बेमुदत संप व आंदोलन छेडून तीव्र संघर्ष उभारण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.



देशातील ११ प्रधान संघटना व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार १२ फेब्रुवारी रोजी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरात सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत निदर्शने करण्यात आली. कामगारविरोधी धोरणांचा निषेध करीत व प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. मागण्यांची दखल न घेतल्यास पुढील काळात बेमुदत संप व आंदोलन छेडून तीव्र संघर्ष उभारण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

नगर-संभाजीनगर रोडवरील सिंचन भवन येथून सकाळी ११ वाजता मोर्चास सुरुवात झाली. विविध विभागांतील कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. महिला कर्मचाऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती. चार कामगार संहिता रद्द करा, पीएफआरडीए कायदा रद्द करा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करा, रिक्त पदे तत्काळ भरा, आठव्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेचा आढावा घ्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. कर्मचाऱ्यांच्या आक्रोशातून शासनाविषयीची नाराजी दिसून आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन करुन निदर्शने केली. या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा शाखेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, समन्वय समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे, हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, आयटकचे कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक संघटनेचे सुनील पंडित, कॉ. महेबूब सय्यद, भाऊ शिंदे, मनपा कामगार संघटनेचे कॉ. आनंद वायकर, दीपक पापडेजा, कमलताई गिरी, डॉ. मुकुंद शिंदे, विलास पेद्राम, भाऊसाहेब डमाळे, विजय काकडे, के. के. आव्हाड, पुरुषोत्तम आडेप, अशोक मासाळ, संदिपान कासार, भागवत नवगण, वैशाली बोडखे, देविदास पाडेकर, श्रीमती व्हि.डी. नेटके आदींसह कर्मचारी, शिक्षक व विविध क्षेत्रातील कामगार सहभागी झाले होते.

निदर्शने करुन प्रमुख वक्त्यांची यावेळी भाषणे झाली. यावेळी केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाबाबत संताप व्यक्त करण्यात आला. कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे दिले. सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर करून शासनाने दिलासा दिला असला, तरी त्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अधिसूचना व नियमावली अद्याप प्रसिद्ध न झाल्याने १ मार्च २०२४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रकरण प्रलंबित असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. अनेकांना तात्पुरते निवृत्ती वेतनही मिळालेले नसल्याने त्यांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

तसेच लिपिकांपासून तृतीय श्रेणीतील वरिष्ठ पदांपर्यंत असलेल्या वेतनत्रुटींचा प्रश्न खुल्लर समितीने अभ्यासला असून, त्या समितीचा अहवाल तातडीने जाहीर करून अन्याय दूर करावा, अशी मागणी करण्यात आली. खाजगीकरण व कंत्राटीकरण धोरणाला मज्जाव करावा तसेच दहा वर्षांहून अधिक सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करावे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक पदभरतीवरील बंदी उठविण्याचीही मागणी करण्यात आली.

कर्मचारी व शिक्षकांसाठी व्यापक कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करावी, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, नोव्हेंबर २००५ पूर्वीची सेवा गृहीत धरून जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०:२०:३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करावा, नगरपंचायत व नगरपरिषदांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सचिव पातळीवर स्वतंत्र चर्चासत्र आयोजित करावे, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांवरील हिंसक हल्ले रोखण्यासाठी आयपीसी कलम ३५३ अजामिनपात्र करावे, अशा एकूण १८ प्रमुख मागण्या आंदोलकांनी मांडल्या.

देशव्यापी संपाच्या अनुषंगाने राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षकांनी सकाळच्या सत्रात ‘दोन तास धरणे सत्याग्रह’ करत शासनाचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री यांनी या प्रश्नांवर तातडीने निर्णायक चर्चा करण्यासाठी तारीख व वेळ जाहीर करण्याची मागणी देखील करण्यात आली.

# शेतकरी, कामगार, कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नगर – केंद्र सरकारने संपूर्ण देशातील संघटीत, असंघटीत कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्या विरुद्ध २१ नोव्हेंबर २०२५ रोजी कामगारविरोधी कार्पोरेट धार्जिण्या चार श्रमसंहिता अंमलात आणल्या त्या मागे घेण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी नवीन महापालिका भवन ते जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगार, शेतकरी, कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. या मध्ये अविनाश घुले, रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, कॉम्रेड सुधीर टोकेकर, युबराज गोकुळ पाटील, विलास पेद्राम, पुरुषोत्तम आडेप, प्रा. सुनील पंडित, अप्पासाहेब शिंदे, प्रा. महेबूब सय्यद, साथी सुभाष वारे, कॉ. किरण वाळके, कॉ. आनंदराव वायकर, जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, गोविंद सांगळे, मधुकर केकाण आदी विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते



अहिल्यानगर शेतकरी, शेतमजूर, कामगार, कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यलय येथे मोर्चा काढण्यात आला होता.

यावेळी बोलताना संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले कि संपूर्ण देशामध्ये शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, संघटीत-असंघटीत कामगार, हमाल मापाडी, बांधकाम कामगार, आदी सर्वच कामगारांचे केंद्र आणि राज्य स्तरावर गेल्या दहा-अकरा वर्षात फारच बिकट प्रश्न तयार झालेले आहेत आमच्या विविध मागण्यांबाबत आम्ही मोर्चा काढला आहे

कामगारविरोधी कार्पोरेटधार्जिण्या चार श्रमसंहिता रद्द करा. सर्व कंत्राटी कर्मचा-याना नियमित करा. कंत्राटी बह्यस्त्रोत दैनिक वेतन पद्धतीची नोकर भरती बंद करूनसर्व रिक्त पदे नियमितपणे भरा, पीएफआरडीए कायदा रद्द करा. एनपीएस/युपीएस योजना रद्द करा. सर्व वर्गणीदारांना ईपीएस ९५ च्या लाभ पेन्शन प्रणाली मध्ये आणा. पेन्शन कायदा २०२५ रद्द करा आणि ओपीएस अंतर्गत पे हक्क पूर्ववत करा. सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण/कंपनीकरण बंद करा.

कंत्राटी कर्मचा-यासह पेन्शन धारक आणि सर्व कर्मचाऱ्यांसाठी सर्व रुग्णालयांमध्ये रोखविरहित सरकारच्या पाठींब्यासह एक सर्व समावेशक आरोग्य विमा योजना लागू करा.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनइपी) रद्द करा, शिक्षकांसाठी अनिवार्य टीईटी चा आदेश मागे घ्या.

संविधानातील कलम ३१०,३११(२) (अ) (ब) (क) रद्द करा.

केंद्र-राज्य संबंधाची पुनर्व्याख्या करा, सहकारी संघराज्याचे संरक्षण करा.

संविधानात अंतर्भूत धर्मनिरपेक्षतेचे रक्षण करा, सर्व प्रकारच्या जातीयावादाविरुद्ध कारवाही करा.

मार्केट कमिट्या बरखास्त करणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये.

माथाडी कामगार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी.

माथाडी कामगारांना पेन्शन सुरू करावी.

सरकारी-निमसरकारी कर्मचा-यांवरील हिंसक हल्ल्यासंदर्भातील कलम ३५३ अजामीनपात्र करा.

शिक्षण विभागात पवित्र पोर्टल मार्फत शिक्षकांची त्वरित भरती करा.

बिडी कामगारांना दर हजारी २५० रुपये मिळालेच पाहिजे.

लिपिक वर्गीय संवर्गासह इतर कर्मचार्याच्या वेतन त्रुटी दूर करा.

शेती संदर्भात स्वामी नाथन आयोगाची अंमलबजावणी करा.

आशा व गट प्रवर्तकांना शासकीय सेवेत सामाऊन घ्यावे. तसेच मानधन वेळेवर मिळावे.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचायांचे वेतन वेळेवर मिळावे,

घरेलू कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती तसेच घरेलू कामगारांना १० हजार रुपये मासिक पेन्शन द्या. ८ व्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेचा आढावा घेऊन दर ५ वर्षानी नियतकालिक वेतन सुधार करा. मूळ वेतनाच्या १० टक्के किंवा ५००० रुपयाच्या अधीन राहून अंतरिम मदत मंजूर करा.

असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना पूर्वी प्रमाणेच असाव्यात त्यात बदल करू नयेत. कामगारांच्या माथाडी कायद्यात बदल करू नये.

केंद्र शासनाने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी ज्या चार कामगार विरोधी श्रमसंहिता अमलात आणल्या त्या कामगार विरोधी असल्याने त्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये. अनेकवेळा केंद्र शासनाने कामगार विरोधी घेतलेले धोरणे मागे घेण्याचे आश्वासने देऊनही आपला शब्द पाळलेला नाही. ही सर्व धोरणे मागे घेऊन केंद्र शासनाला कामगार हित जपण्यासाठीची धोरणे घेण्यासाठी आणि कामगार विरोधी धोरणे मागे घेण्यासाठी संपूर्ण देशातील सर्वच क्षेत्रातील १० केंद्रीय कामगार संघटना आणि राज्य पातळीवर ५५ फेडरेशन एकत्रित आज संपावर जात आहोत. या मोर्चा मध्ये अविनाश घुले, रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, कॉम्रेड सुधीर टोकेकर, युबराज गोकुळ पाटील, विलास पेद्राम, पुरुषोत्तम आडेप, प्रा. सुनील पंडित, अप्पासाहेब शिंदे, प्रा. महेबूब सय्यद, साथी सुभाष वारे, कॉ. किरण वाळके, कॉ. आनंदराव वायकर, जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, गोविंद सांगळे, मधुकर केकाण आदी विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.


देशव्यापी कामगार संपानिमित्त नेप्ती बाजार समिती येथे कामगार, माथाडी, हमाल आदींनी दुकाने बंद ठेवून ‘संपा’स पाठिंबा दिला.

# उद्योजक भावंडांना १ वर्षाच्या कारावासाची शिक्षा व ३२,९६,३६९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश

नगर – अहमदनगर येथील अतिरिक्त न्याय दंडाधिकारी यांच्या कोर्टाने फौजदारी खटला क्र. ८८७९/२०२४ मधील आरोपी असलेले दोन्ही उद्योजक भावंडांना १ वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा व ३२,९६,३६९ रुपये (अक्षरी रुपये बत्तीस लाख शहाण्णव हजार तीनशे एकोणसत्तर) नुकसानभरपाई फिर्यादी यांना देण्याचे आदेश ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिले आहे. सदर फिर्याद पुष्कराज इंटरप्राईजेस यांनी या आरोपींविरुद्ध दाखल केली होती

या खटल्याची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की सुपा येथील कल्पक स्टील्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी सतीश माणिकराव झेंडे व सुहास माणिकराव झेंडे यांच्या मालकीची आहे. कंपनीसाठी आवश्यक असलेला कच्चा माल त्यांनी या उधार देणे बाकी रक्कम पोटी दोन्ही भावंडांनी त्यांच्या कंपनीचे ३ चेक रक्कम २८,४७, ८३५ रुपये फिर्यादी यांना दिले होते. फिर्यादी यांनी सदर चेक वाटण्या कामे बँकेत भरले असता ते न वाटता परत आल्यामुळे फिर्यादी यांनी कंपनी व कंपनीचे मालक असलेल्या दोन्ही भावंडांविरुद्ध कोर्टात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट चे कलम कलम १३८ फौजदारी खटला १८ सप्टेंबर २०२४ रोजी दाखल केला होता.

या खटल्यात फिर्यादी पुष्कराज इंटरप्राईजेस च्या वतीने त्यांचे मालक विजय रतनलाल झंवर यांनी कोर्टात साक्ष देत आरोपी यांनी उदर खाते ठेवून खरेदी केलेल्या मालाबाबत चे पुरावे दाखल केले. सदर खटल्यात आरोपी आणि तक्रारदार यांच्यात कोणताही व्यवहार झाला नसल्याचा बचाव घेण्यात आला आहे. जर कोणताही व्यवहार झाला नव्हता, तर त्यांचे धनादेश तक्रारदाराच्या ताब्यात कसे आले, याचे स्पष्टीकरण आरोपी देऊ शकले नाहीत. तक्रारदाराचे यांची केस खोटी असल्याबाबत आरोपींनी कोणताही पुरावा दिला नाही. याउलट फिर्यादीने केसमध्ये दिलेले पुरावे मेहरबान न्यायालयाने ग्राह्य धरत फिर्यादी यांनी सर्व आरोपींकडून कायदेशीररित्या वसुलीयोग्य रक्कम येणे बाकी पोटी आरोपी यांनी चेक दिले होते हे मेहरबान न्यायालयाने ग्राह्य धरले. शिवाय निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत फिर्यादी आणि आरोपी यांना दिलेल्या वैधानिक नोटीसला उत्तर देण्यात आरोपी अपयशी ठरल्यामुळे तक्रारदाराच्या म्हणण्यात तथ्य असल्याचा निष्कर्ष मेहरबान न्यायालयाने नोंदविला.

त्यात फिर्यादी व आरोपी यांनी सादर केलेले पुरावे व उलट तपास विचारात घेऊन मेहरबान न्यायालयाने या केसमधील आरोपी क्रमांक १ कंपनी व या कंपनीचे संचालक असलेले आरोपी क्रमांक २ व ३ यांना नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट, १८८१ च्या कलम १३८ आणि कलम १४१ अन्वये तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २७८ (२) अंतर्गत गुन्ह्यासाठी दोषी ठरवत आरोपी क्र. २ सतीश माणिकराव झेंडे आणि आरोपी क्र. ३ सुहास माणिकराव झेंडे यांना १ वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

३. आरोपी क्र. १ कल्पक स्टील्स प्रायव्हेट लिमिटेड, आरोपी क्र. २ सतीश माणिकराव झेंडे आणि आरोपी क्र. ३ सुहास माणिकराव झेंडे यांनी एकत्रितपणे आणि वैयक्तिकरीत्या तक्रारदाराला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३९५ (१) (ब) नुसार, या निकालाच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत ३२,९६,३६९ रुपये (अक्षरी रुपये बत्तीस लाख शहाण्णव हजार तीनशे एकोणसत्तर) नुकसानभरपाई म्हणून द्यावेत. नुकसानभरपाईची सदर रक्कम न भरल्यास, आरोपी क्र. २ सतीश माणिकराव झेंडे आणि आरोपी क्र. ३ सुहास माणिकराव झेंडे यांना ६ महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल असा निकाल दिला आहे

खटल्यामध्ये फिर्यादी यांच्या वतीने ॲड. श्याम असावा यांनी कोर्टात बाजू मांडली त्यांना ॲड. सोमेश पालीवाल व ॲड. प्रांजल म्हणून यांनी सहाय्य केले.

# देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर बीएसएनएल कर्मचाऱ्यांची निदर्शने

### काम बंद ठेवून सहभाग; ४ जी-५ जी सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी; वेतन रिविजन, पदोन्नती धोरण व आउटसोर्सिंग थांबविण्यावर भर देण्यासाठीचा आग्रह

नगर – अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने १२ फेब्रुवारी रोजी पुकारलेल्या देशव्यापी संपात बीएसएनएलचे कर्मचारी सहभागी झाले. सरकारी-निमसरकारी कर्मचारी, विविध क्षेत्रांतील कामगार तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आयोजित या संपात बीएसएनएल कर्मचाऱ्यांनी काम बंद ठेवत बीएसएनएल कार्यालयासमोर निदर्शने केली.


सरकारी-निमसरकारी कर्मचारी, विविध क्षेत्रांतील कामगार तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आयोजित या संपात बीएसएनएल कर्मचाऱ्यांनी काम बंद ठेवत बीएसएनएल कार्यालयासमोर निदर्शने केली.

बीएसएनएलला कमकुवत करू नका, 4G सेवा तातडीने सुरू करा, 5G अंमलबजावणी जलद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सार्वजनिक क्षेत्रातील या महत्त्वाच्या दूरसंचार कंपनीला सक्षम करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलकांनी केली. बीएसएनएलला स्पर्धात्मक बनवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी वेळेत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या आंदोलनात कॉ. आप्पा गागरे, बीएसएनएल एम्पलॉईज युनियनचे जिल्हा सचिव कॉ. विजय शिपणकर, महाराष्ट्र परिमंडळाचे कॉ. संतोष शिंदे, जिल्हा खजिनदार कॉ. शंकर चेडे, नॅशनल फेडरेशन युनियनचे जिल्हा सचिव कॉ. अशोक हिंगे, चंद्रकला नवले, आयेशा शेख, कॉ. सिंधू पवार, संतोष भोसले, अशोक पाखरे, प्रशांत अष्टेकर, ज्ञानेश्वर येवले, मच्छिंद्र ढोके, मोहम्मद शेख, रावसाहेब वाघ, गोरख पवार, भाऊसाहेब दरेकर, रमेश सोनवणे, शिवाजी मोढवे, बाळासाहेब वाळके, तात्याबा पाटोळे, चंद्रकांत बोळे, माधव हजारे, गोरख मोढवे, वजीर शेख, ल्युथर गायकवाड, विलास भोसले, अर्जुन वाळके, मारुती जाधव, राजेंद्र कोकरे, चंद्रकांत जाधव, उत्तम शिंदे, दिलीप गडकर, कॉ. रमेश शिंदे, कॉ. अर्जुन वाळके आदींसह बीएसएनएल कामगार सहभागी झाले होते.

आंदोलकांनी ‘परवडण्यायोग्यता कलम’ (Affordability Clause) तात्काळ शिथिल करून कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनरावलोकनाचा (वेतन रिविजन) प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावा, अशी मागणी केली. नॉन-एक्झिक्युटिव्ह कर्मचाऱ्यांसाठी नवीन पदोन्नती धोरण (NEPP) लागू करावे तसेच नॉन-एक्झिक्युटिव्ह व एक्झिक्युटिव्ह कर्मचाऱ्यांमधील पदोन्नती संधीतील भेदभाव दूर करावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

कॉ. आप्पा गागरे म्हणाले की, विकासाच्या नावाखाली सरकार कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात घालू पाहत आहे. खाजगीकरणामुळे सर्वांचे भविष्य उध्वस्त होणार आहे. कामगार गुलाम नसून, ते देशाचे सेवक आहे. भांडवलदाराच्या हिताचे निर्णय घेऊन कामगारांना गुलाम बनवण्याचे धोरण सुरू आहे. दिल्लीत शेतकरी आंदोलनाप्रमाणे कामगारांना लढा उभारावा लागणार असल्याचे स्पष्ट करुन कामगार विरोधी कायदे मागे घेण्याची मागणी त्यांनी केली.

कॉ. विजय शिपणकर म्हणाले की, मनुष्यबळ पुनर्रचनेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेली पदकपात रद्द करावी, सर्व संवर्गांतील रिक्त पदे तातडीने भरावीत आणि अंतर्गत परीक्षांमध्ये पुरेशा जागांची उपलब्धता सुनिश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली. बीएसएनएलच्या कामांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले आउटसोर्सिंग तात्काळ थांबवावे, तसेच दैनंदिन संचालन व देखभाल सेवांमधून टीआयपींना (TIPs) दूर करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कंत्राटी व नैमित्तिक कामगारांच्या छाटणीस विरोध करत त्यांच्या शोषणाला आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली. २०२५ सालापर्यंत देय असलेले किमान वेतन, ईपीएफ, ईएसआय तसेच महागाई भत्त्याची थकबाकी तत्काळ अदा करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

देशव्यापी संपाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष बीएसएनएल व त्यातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रातील या महत्त्वाच्या दूरसंचार संस्थेला सक्षम व स्पर्धात्मक बनवण्यासाठी सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला.

# वेतन निश्चितीतील विसंगतीवरून आयटीआय निदेशक संघटनेचे १३ फेब्रुवारी रोजी काळ्या फिती लावून कामकाज, एकदिवसीय लाक्षणिक उपोषण व निषेध आंदोलन

### नाशिक विभागीय संघटनेचे अध्यक्ष जालिंदर खाकाळ यांची माहिती

नगर – नाशिक शासन निर्णय १६ ऑगस्ट २०२४ नुसार अभावित सेवा ग्राह्य धरून वेतन निश्चिती करण्याबाबत राज्यातील इतर विभागांत कार्यवाही पूर्ण झालेली असताना, नाशिक विभागात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ४४ लागू केल्याने वेतन निश्चितीत विसंगती निर्माण झाल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेने केला आहे. या आदेशामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना शासननिर्णयानुसार लाभ मिळण्यास अडथळा निर्माण झाला असून विभागात असंतोष पसरल्याचे संघटनेने म्हटले आहे.



संघटनेने १२ मार्च २०२५ च्या कार्यालयीन आदेशातील नियम ४४ संबंधी अट तात्काळ रद्द करून शासन निर्णयानुसार वेतन निश्चिती व सेवा लाभ देण्याची मागणी केली आहे. तसेच आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षण योजनेअंतर्गत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी प्रलंबित लाभ त्वरित मंजूर करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १३ फेब्रुवारी रोजी नाशिक प्रादेशिक कार्यालयासमोर काळ्या फिती लावून कामकाज, एकदिवसीय लाक्षणिक उपोषण व निषेध आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नाशिक विभागीय संघटनेचे अध्यक्ष जालिंदर खाकाळ यांनी दिला असून महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे राज्य पदाधिकारी व नाशिक विभागीय संघटनेचे पदाधिकारी लाक्षणिक उपोषणात सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### आमदार सत्यजित तांबे यांचा पाठिंबा

संबंधित मागण्यांना पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला असून तातडीने कार्यवाही न झाल्यास आंदोलनात सहभागी होण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

